09 To 15 JANUARY 2023 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 1/7/2023 9:21 PM Page 1


|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ३ सोमवार दि. ०९ जानेवारी २०२३ ते रविवार दि. १५ जानेवारी २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## अल्पवयीन मुलांच्या वादाचा भयंकर थरार सोळा वर्षांच्या मुलाला चौघांनी केले ठार

मुंबई/क्राईम रिपोर्टर

आजकाल लहान मुलांना नशेची आदत लागली आहे. अगदी दारू सिगारेट पासून अमली पदार्थांपर्यंत हि मुले नशेच्या आहारी जात आहेत आणि त्यातूनच त्यांची पावले गुन्हेगारीकडे वळत आहेत. मानखुर्दमध्ये अशाच ४ अल्पवयीन मुलांनी एका १६ वर्षांच्या मुलाची १४ वार करून निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून सर्व आरोपींना अटक केली आहे. ही घटना ४ जानेवारी रोजी संध्याकाळी सहाच्या सुमारास घडली. ...पान २ वर

## प्रेमाच्या चक्रव्युहात रखेलीच्या मुलीने घात केला मुलाच्या 'लव्ह स्टोरी'मुळेच बापाचा जीव गेला

पंढरपुर/क्राईम रिपोर्टर



मयत अफजल

प्रेम आंधळे असते. त्यामुळे प्रेमाला जात धर्म नातीगोती काहीही दिसत नाही आणि दिसले तरी प्रेमाला कुणाचीही पर्वा नसते. त्यामुळे अनेक वेळा काही मुली नात्यातल्याच तरुणाच्या प्रेमात पडतात आणि आई-वडिलांचा विरोध झुगारून प्रेम विवाह करतात. पण अशा प्रेम विवाहातून जे वाद निर्माण होतात, त्या वादातून एखाद्याला आपला जीवही गमवावा लागतो. कारण नाती जपायची असतात. नात्याला डाग लावायचा नसतो. अशी आपल्या धर्म संस्कृतीची शिकवण आहे आणि परंपरेनुसार ती वर्षान वर्ष सुरु आहे. त्यामुळे रूढी परंपरेच्या विरोधात जर कुणी गेला, तर त्याला कुटुंबातील लोकांचा आणि समाजाचा सुद्धा विरोध सहन करावा लागतो आणि जो कुटुंबाच्या किंवा समाजाच्या विरोधात जाऊन नात्यातील मुलीशीच लग्नगाठ बांधतो त्याचे काही खरे नसते. एक तर अशा घटनेमध्ये त्याचा तरी जीव जातो किंवा तो तरी विरोध करणाऱ्यांचा जीव घेतो. बरे काही नाती नैतिक असतात तर काही अनैतिक असतात. अनैतिक संबंधातून एकत्र राहणाऱ्या जोडप्यांच्या मुलांनाही अप्रत्यक्षपणे का होईना नात्यांचा मान राखावाच लागतो. लातूर येथील कांद्या-बटाट्याचे व्यापारी अफजल बागवान यांचे ज्या महिलेशी अनैतिक संबंध होते तिच्याच मुलीशी बागवान यांच्या मुलाचे प्रेम जुळले. त्यामुळे बागवान यांचा या प्रेम संबंधांना विरोध होता. बागवान यांच्या दृष्टीने रखेलीची मुलगी हि त्यांच्या मुलीसारखीच होती, अशावेळी आपल्या मुलाचे आणि तिचे अप्रत्यक्ष रित्या बहिण भावाचे नाते होते. त्यामुळे बागवान यांचा विरोध होता. अखेर हा विरोध मोडून काढण्यासाठी त्यांचा मुलगा सोहेल आणि त्याच्या प्रेयसीने म्हणजेच बागवान यांच्या रखेलीच्या मुलीने बागवान यांचा काटा काढण्याची योजना आखली. त्यानुसार ती आणि तिच्या भावाने बागवान यांना कासेगावला मामाकडे जायचे आहे असे सांगून बरोबर घेतले आणि रिक्षाने कासेगावकडे निघाले. मात्र मधेच रस्त्यावर अडवून बहिण भावाने बागवान यांना रिक्षातून बाहेर काढून मारहाण केली. त्यानंतर त्या मुलीने बागवान यांच्या डोक्यात दगड घालून त्यांची हत्या केली. याचवेळी तिथे लपून बसलेला बागवान यांचा मुलगा सोहेल बाहेर आला आणि त्याने वडिलांच्या मृतदेहावर पेट्रोल ओतून मृतदेह जाळून टाकला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.



लातुर येथील एका अल्पवयीन मुलीबरोबर अफजल बागवान यांचा मुलगा सोहेल बागवान याचे प्रेमसंबंध होते. त्या मुलीला तो अगोदरपासून ओळखत होता. कारण अफजल बागवान याचे त्या मुलीच्या आईशी प्रेमसंबंध होते. त्या मुलीची आई ही अफजल बागवान यांची रखेल होती. त्यामुळे त्याचे तिच्या घरी कायम येणे जाणे होते. जवळपास १५ ते २० वर्ष हे संबंध असल्याने नात्याने ती मुलगी त्यांना मुलगीच लागत होती. हे नातेसंबंध माहित असताना देखील अफजल यांचा मुलगा सोहेल हा त्या मुलीच्या प्रेमात पडला होता. खरे तर ती त्याला बहिणीसारखीच होती. परंतु प्रेमात आंधळे झालेल्या त्या मुलीला आणि सोहेलला हे नाते संबंध मान्य नव्हते. ते दोघे भेटत होते. त्याच्यात ते संबंध देखील आले होते. ते दोघे प्रेमात भरकटत चालले आहेत हे अफजल आणि त्यांनी ठेवलेल्या बाईला देखील माहित होते. त्याच्या त्या नातेसंबंधाना त्या बाईचा काही विरोध नव्हता. ती आपल्या मुलीला सोहेलला भेटू देत होती. तिला तेच पाहिजे होते. या पाठीमागील कारण तिलाच माहित होते. आपला मुलगा आपण ठेवलेल्या बाईच्या मुलीच्या नादी लागलेला आहे त्याला यापासून वेगळे करायला पाहिजे असा विचार अफजल याच्या मनात येत होता. कारण ती बाई काय आहे आणि त्यावर तिची मुलगी कशी असेल हे वेगळे सांगण्याची गरज त्यांना नव्हती. म्हणून ते मुलाच्या प्रेमसंबंधाला विरोध करीत होते. परंतु हे सोहेलच्या लक्षात येत नव्हते. तो त्या मुलीला घेऊन हिंडत होता. त्याला ही त्या कामासाठी ती पाहिजे असल्याने तिच्या प्रेमात तो जवळपास वेडाच झाला होता. त्याला आपल्या वडिलांचा खूप ...पान २ वर

## भीती पोटी शरीरसुखास दिला तिने नकार पळून जाताना महिलेला त्याने केले ठार

लातूर/करकरे आंबादास



बाई किती जरी बाहेरख्याली असली तरी अनोळखी माणसाबरोबर शय्यासोबतीला जाताना तिच्या मनात कुठेतरी भीती असते. हॉटेलात वेटर म्हणून काम करणाऱ्या मनोज कदम याने एका मुली पुरवणाऱ्या दलाल महिलेच्या माध्यमातून एका महिलेला वासंगाव शिवारात आणले होते. मात्र त्या ठिकाणी इतर माणसे बघून ती महिला घाबरली आणि तिने मनोज बरोबर शिवारात जायला नकार दिला. त्यामुळे चिडलेल्या मनोजने डोक्यात दगड घालून त्या महिलेची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.





आरोपी कदम

लातूर शहरातील बाभळगाव रोड परिसरात असलेल्या महाडा कॉलनीतील नंदिनी विजय सोनपरके नावाची ४२ वर्षीय महिला १९ डिसेंबर पासून बेपत्ता असल्याने तिच्या मुलांनी आणी नातेवाईकांनी तिचा शोध घेणे सुरू केले होता मात्र तिचा कुठेच ठावठिकाणा लागत नसल्याने बहुतेक ती दूरच्या नातेवाईकाकडे गेली असावी असा अंदाज बांधून तिच्या दोन मुलांनी आईची वाट पाहण्या पलीकडे काहीच केले नाही. दरम्यान म्हाड कॉलनीतील काही नागरीकांनी औसा रोड परिसरातील वासनगाव शिवारातील एका निर्जळ स्थळी नेदिनी सारख्या वर्णाच्या महिलेचा मृतदेह आढळून आल्याची वार्ता तीच्या मुलांना दिली. त्यावरून तिच्या नातेवाईकांनी आणी मुलांनी घटनास्थळी जावून पाहिले. नंदनिच्या बोटातील अंगठी आणी पायातील चप्पलवरून तीची औळख पटविली. त्यांनी तात्काळ लातूर ग्रामीण पोलीस स्टेशनला माहिती कळवीली.मिळालेल्या माहिती आधारे लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळाला भेट दिली. ...पान २ वर

## बहिणीवरचा राग तिच्या सासऱ्यावर काढला संतापलेल्या भावाने रस्त्यातच मुडदा पाडला

जळगाव/क्राईम रिपोर्टर

एखाद्याची बहिण दुसऱ्या सोबत पळून गेली, तर कुठलाही भाऊ ते सहन करू शकत नाही. कारण तिच्यामुळे कुटुंबाची समाजात बेअब्रू झालेली असते. जळगाव जिल्ह्यातील मेहुणबारे गावातील सचिन चव्हाण याच्या बहिणीने पळून जाऊन प्रेमविवाह केला होता. त्यामुळे सचिन आणि त्याचे कुटुंबीय भयंकर चिडले होते. सचिनचा तर बहिणीवर भयंकर राग होता. त्यातच बहिणीचा सासरा सचिनच्या आईला अधून मधून टोमणे मारीत असे. त्यामुळे चव्हाण कुटुंबाच्या संतापाच्या आगीत तेल ओतले गेले आणि एके दिवशी सचिनने भर रस्त्यात बहिणीच्या सासऱ्याला गाठले आणि त्याची मानच तोडली. या प्रकरणी पोलिसांनी सचिनला अटक केली आहे.





पुर्वीच्या काळी मुला मुलींचे लग्न त्यांचे पालक निश्चित करत असत. आपल्या मुलासाठी अथवा मुलीसाठी कोणते स्थळ योग्य आहे, त्याचा अथवा तिचा विवाह कधी करायचा हे सर्व निर्णय घरातील कर्ता पुरुष घेत असे. घरातील कर्त्या पुरुषाचा निर्णय योग्य समजून त्याला कुणी विरोध करत नव्हते. मात्र आता काळ बदलला. आता मुला मुलींच्या आवडी निवडीनुसार वर वधूची पसंती अथवा निवड होण्याचे दिवस आले आहेत. समाजाच्या चालीरितीनुसार समाजातील मुला मुलींचे एकमेकांसोबत ठरवून केलेले लग्न हा समाजमान्य प्रकार समजला जातो. या प्रकारात ...पान २ वर

## रिकाम टेकड्या नातवाला लागली पैशाची हाव आजी आजोबावर घातले त्याने कुऱ्हाडीचे घाव



नाशिक/क्राईम रिपोर्टर



उतारवयातील आई-वडील किंवा आजी-आजोबा यांची जबाबदारी मुलांच्या किंवा नातवांच्या खांद्यावर असते. पण काही मुले कमावती झाली तरी कामधंदा न करता पैशासाठी आई-वडिलांनाच सतावत असतात आणि पैसे मिळाले नाहीत तर आई-वडिलांचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाहीत. नाशिक जिल्ह्याच्या उंबरदरी गावातील राजकुमार कोल्हे हा तर त्याच्याही पलीकडे गेला होतो. तो पैशासाठी चक्क आजी-आजोबांना त्रास देत असे. मात्र एकदा आजी आजोबाने पैसे देण्यास नकार देताच या माथेफिरू नातवाने कुऱ्हाडीचे घाव घालून वृद्ध आजी आजोबाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी माथेफिरू नातवाला अटक केली आहे.



आरोपी राजकुमार

आई बाप जन्माला पुरत नसतात. आई बापच मुलांच्या जन्माला पुरत नसतांना आजी आजोबा आणि नातवंड ही फार लांबची गोष्ट म्हटली पाहिजे. एका ठरावीक कालावधीपर्यंत आजी आजोबा नातवंडाचे कोडकौतुक आणि त्यांचे लाड चांगल्या प्रकारे पुर्ण करु शकतात. जो पर्यंत नातवंड साधारण आठ ते दहा वर्षांची असतात तोपर्यंत आजी आजोबा त्यांची हौस चांगल्या प्रकारे पुर्ण करतात. मात्र तरुण आणि कमावत्या वयातील नातवाने नव्वदी गाठलेल्या आजोबांकडे पॉकेटमनीसाठी पैसे मागणे कितपत योग्य ठरते? हा प्रश्न कदाचित विचीत्र वाटत असेल. मात्र हे सत्य आहे. पॉकेटमनीसाठी पैसे मिळाले नाही म्हणून नातवाने आपल्या आजी-आजोबांची ...पान ६ वर

## शेजाऱ्यांशी असलेला वाद विकोपाला गेला भांडखोर भाडेकरूमुळेच घरमालक मेला





इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

भाड्याने घर देताना भाडेकरूची सर्व माहिती घेऊनच घर भाड्याने द्यायचे असते अन्यथा भाडेकरू जर चांगला नसेल तर घर मालकाला दुष्परिणाम भोगावे लागतात. इचलकरंजीत असेच झाले, राजेशकुमार जोशी या कापड व्यापाऱ्याने भाडेकरू ठेवला होता, पण तो भांडखोर निघाल्याने त्याचा शेजाऱ्यांना त्रास होऊ लागला. त्यामुळे त्या भाडेकरूला घरातून बाहेर काढा असे वारंवार शेजाऱ्यांनी राजेश कुमार यांना सांगितले. पण त्यांनी लक्ष दिला नाही. त्यामुळे शेजाऱ्यांनी घरमालक असलेल्या राजेश कुमार आणि त्याच्या पत्नीवर हल्ला केला. यात राजेशकुमार याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी ९ पैकी २ आरोपींना अटक केली असून इतरांचा शोध सुरु आहे.

राजेशकुमार जोशी हे गेल्या ३०वर्षापूर्वी इचलकरंजी शहरात कापड व्यापाऱ्याच्या निमित्याने आले. सुरूवातीला ते कुंभार गल्ली येथे भाडयाने घर घेऊन पत्नी मुलासह राहू लागले. कापड व्यापारात त्यांचा जम बसल्यावर त्यांनी महात्मा फुले पुतळ्या जवळ गोसावी गल्लीत डॉ.पोतदार याच्या समोरील एक बंगला विकत घेतला आणि तेथे ते पत्नी संतोषदेवी ...पान ६ वर

## गुटखा खाऊन मंजुनाथ थुंकला टपरीवरच्या वादात प्राणाला मुकला

बेळगावी (बैलहोंगल)/क्राईम रिपोर्टर



दारू, गुटखा माणसाच्या प्रकृतीला हानिकारक असतात. तरीही माणूस हि व्यसने करतो. पण कधी कधी याच व्यसनांच्या वादातून माणसाला त्याला जीव गमवावा लागतो. बेळगाव नजीकच्या अनिगोळमध्ये राहणाऱ्या मंजुनाथच्या बाबतीतही असेच घडले. नववर्षाच्या दारूच्या पार्टीनंतर तो टपरीवर गुटखा खाण्यासाठी गेला. पण गुटखा खाऊन थुंकत असताना त्याच्या सोबत असलेल्या ओळखीच्या तरुणाच्या अंगावर थुंकी उडाली. या शुल्लक कारणावरून मंजुनाथ आणि त्याच्या सोबत असलेल्या अजयमध्ये वाद झाला आणि अजयने मंजुनाथच्या डोक्यात दगड घालून त्याची हत्या केली. या प्रकरणी अजयला अटक करण्यात आली आहे.

बैलहोंगल जवळील अनिगोळ येथे मंजुनाथ सुणगार हे आपल्या पत्नी मुलासह राहयला आहेत.त्याच्या घरची शेती असल्याने त्याची आर्थिक परिस्थिती ही तशी सधन असल्याने मंजुनाथ याला दारू पिण्याची सवय होती.चार मित्रांना घेऊन कायम पार्टी करणे त्यांना खायला प्यायला घालणे असे तो करीत होता. ...पान ६ वर

## लग्नासाठी त्याच्यामागे तिने तगादा लावला प्रियकरानेच प्रेयसीला वरचा रस्ता दावला

टिटवाला/एस.कुमार



मयत रुपांजली

अनैतिक संबंध हे प्रामुख्याने शारीरिक आकर्षणातून निर्माण होत असतात. पण त्यासाठी स्त्रीला काहीना काही आमिष दाखवावे लागते, तरच ती शरीर सुखासाठी तयार होते. अशावेळी बहुतेक पुरुषांकडून त्याच्यासोबत प्रेमसंबंध ठेवणाऱ्या तरुणीला लग्नाचे आमिष दाखवले जाते. पतीला सोडून लातूरला माहेरी राहणाऱ्या रुपांजली हिचे जयराम चौरे याच्याशी अनैतिक संबंध होते. जयरामने तिला लग्नाचे वचन दिले होते. पण नंतर मात्र तो टाळाटाळ करू लागला. पण तिने मात्र त्याच्या मागे लग्नाचा तगादा लावला होता. अखेर तिच्या पासून कायमची सुटका करून घेण्यासाठी जयरामने मित्राच्या मदतीने तिची हत्या केली. पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



२६ डिसेंबर रोजी कल्याण तालुक्यातील रेवती गाव येथील हद्दीतील जंगलात एका महिलेचा मृतदेह पडला असल्याची माहिती टिटवाळा पोलिसांना मिळाली होती. टिटवाळा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे आणि पथक ...पान २ वर

पान १ वरून....

## अल्पवयीन मुलांच्या वादाचा...

ही सर्व अल्पवयीन मुलं नशा करत होते. काही दिवसांपूर्वी त्यांच्यामध्ये काही कारणावरुन वाद झाला होता. त्याच वादातून परवा संध्याकाळी चार जणांनी १६ वर्षीय मुलाची हत्या करण्याचं ठरवलं. सर्व जण एकत्र बसलेले असताना चार मुलांनी कोयता आणि चाकूच्या साहाय्याने मित्राची हत्या केली. आरोपी अल्पवयीन मुलांनी मृत मुलाच्या शरीरावर १४ ठिकाणी वार केले, ज्यामुळे अतिरक्तस्राव होऊन त्याचा मृत्यू झाला. डोक्याला, मानेला आणि हाताला गंभीर जखमा होऊन अतिरक्तस्राव झाल्याने मुलाचा मृत्यू झाल्याचं पोस्टमॉर्टेम रिपोर्टमध्ये समोर आल्याची माहिती मानखुर्द पोलिसांनी दिली. या प्रकरणी मानखुर्द पोलीस स्टेशनमध्ये आयपीसीच्या कलम ३०२ आणि ३४ अंतर्गत चारही अल्पवयीन आरोपींविरोधात गुन्ह्याची नोंद झाली आहे. या अल्पवयीन आरोपींना बालसुधारगृहात पाठवण्यात आलं असून पोलीस तपास करत आहेत. दरम्यान मृत मुलाच्या आई-वडिलांचा घटस्फोट झाला असून त्याची आई दुबईमध्ये काम करते आणि वडील मुंबईत राहतात.

## भीती पोटी शरीरसुखास दिला...

घटनास्थळावर एक ४० ते ४५ वर्षीय महिला रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. तिचा चेहरा छन्नविछीन्न झाला होता. घटनेची प्राथमिक माहिती घेत लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांना खबर दिली. ग्रामपंचयत निवडणूकीच्या बदोबस्तात आसलेले लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ घटनास्थळाकडे धाव घेतली. घटनास्थळाभोवती लोकांची गर्दी दिसत होती. पोलिसांनी घटनास्थळ गाठून घटनेची प्राथमिक माहिती घेण्यास सुरूवात केली. अंगावर निळी साडी परिधान केलेली आणि गळ्यात पिवळसर स्कार्फ आसलेली महिलेच्या डौक्याभोवती रक्ताचा सडा पडला होता. बहूतेक मारेकऱ्यांने दगडा सारख्या जाड वस्तूच्या साह्याने महिलेचे डोके ठेसले असावे आसा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला. दरम्यान घटनास्थळाला लातूर ग्रामीण उपविभागी पोलीस अधिकारी सुनील गोसावी यांनी घटनास्थळाला भेट देऊन पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना योग्य त्या सूचना करून पंचनामा करून घेण्याचे आदेश दिले. पोलिसांनी पंचनाम्याला सुरूवात केली. पोलिसांनी काही महत्वाचा पुरावा मिळतो का हे पाहण्यासाठी घटनास्थळाचा परीसर पिंजून काढला. घटनस्थळावर बरीच झटापट झाल्याचे दिसत होते. एखाद्या महिलेचा अशा प्रकारी खून व्हावा यामागे काय कराण असावे याबाबत पोलिस तर्क वितर्क लावत होते. बहूतेक अनैतिक संबधातून हा प्रकार घडला असावा असाच कयास सगळेजण मांडत होते. पोलिसांनी घटनास्थळावरी आवश्यक ती माहिती घेवून प्रेत उत्तरणीय तपासणी साठी शासकिय रूग्णालयात पाठविले. दरम्यान मयत महिलेच्या मुलांने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात लोकांनी अज्ञात कारणासाठी नंदिनी सांनपरखे हिचा खून केल्याच्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लातूर ग्रामीण येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २७१/२०२२ कलम ३०२, २०१ भादवी तसेच (२)(त) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधिक्षक डॉ. अजय देवरे, लातूर ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील गोसावी यांचे मार्गदर्शनात तपसाचे सर्व सुत्र लातूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांच्या हाती देण्यात आले. तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांना समांतर चपासाचे आदेश देण्यात आले. तपासाचे चक्र गतीमान करून लातूर ग्रामीण पोलिस ठाणंयाचे पोलिस निरीक्षक गणेश कदम यांनी या खून प्रकरणातील मयत महिलेची प्राथमिक माहिती घेणयासाठी पोलिसांचे एक पथक तयार केले. या पथकात साहायक पोलिस निरीक्षक प्रतिभा ठाकूर, पोहे चंद्रपटले, पोकॉ अक्षय डिगोळे, गजानन टारपे, राहूल रेड्डी यांचा समावेश करण्यात आला. या पथकाने प्रथमता मयचे घर गाठले. तेंव्हा मयत महिलेच्या नातेवाइंकडून मयत महिली हि गेल्या अनके वर्षापसून आपल्या दोन मुलांसोबत राहत होती. नवऱ्यापासुन विभक्त राहात आसल्याने कुटूबांची सर्व जबाबदारी तीच्यावर येवून ठेपली होती. मुल मोठी व कमवती झाल्याने तीची काहीप्रमाणात जबाबदरी कमी झाली होती.मुलांच्या विवाहानंतर ती एकदम निवांत झाली होती.एवढी माहीती पोलिसांनी हास्तगत केली. दरम्यान त्याच भागात लातूर ग्रामीण पोलिसांनी गुप्त माहिती घेतली असता. नंदिनी सोनपारखे हि वाम मार्गाने वागणाऱ्या महिलांच्या सर्पकात आसल्याची गुप्त माहिती मिळाली. या माहिती अधारे पोलिसांनी तपासाची दिशा ठरविली. नंदिनी सोनपारखे वापरत आसलेल्या मोबईलची माहिती घेतली असता पोलिसांनी अनेक बांबींचा उलगडा झाला. पोलिस पथकाने तपासाची दिशा ठरवत १९ डिसेंबर रोजी नंदिनीच्या संर्पकात आसलेल्या सर्व लोकांची माहीती घेवून त्यांच्याकडे चौकशी केली. त्या दिवशी नंदिनी कुठे कुठक गेली याचा घटनक्रम जाणून घेतला. शेवटी एका गुप्त माहितीवरून याखून प्रकरणातील संशयीताच्या मागावर पोलिसांचे पथक रवाना झाले. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पालिस निरीक्षक गजानन भातलवंडे यांनी या खून प्रकरणातील आरोपीचा शोध कामी पोलिसांचे एक पथक तयार केले. यात अंमलदार राजेंद्र टेकाळे, रामहरी भोसले, प्रकाश भोसले, नवनाथ हासबे, राजेश कंचे, तुराब पठाण चालक चंद्रकांत केंद्रे यांचा समावेश करण्यात आला होता. या पथकातील पोलिसांनी एका तांत्रिक माहीती अधारे या खून प्रकरणातील संशयीत आरोपी मदन उर्फ मनोज कदम याचा माग काढणेयास सुरूवात केली. सदर पथके आरोपीचे शोध कामी वेगवेगळया भागात रवाना केले. त्या दरम्यान दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजी आरोपी मदन लालासाहेब कदम हा औसा ते निलंगा जाणारे रोडवरील करजगावपाटी परिसरात फिरत असल्याची गुप्तबातमीदारा मार्फत माहिती मिळाली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आणी लातूर ग्रामीण पोलिसांनी संयुक्त कारवाही करत फरार होण्याच्या बेतात आसलेला आरोपी मदन उर्फ मनोज कदम यास खुनाच्या गुन्हयात ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही करिता पोलीस ठाणे लातूर ग्रामीण येथे हजर केले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांने पोलिसांनी असमाधानकरक अत्तरे दिली. त्याला विश्वासात घेवून अशिक चौकशी केली असता त्यांने आपल्या गुन्ह्याची कबूली दिली.मदन उर्फ मनोज कदम हा मुळचा मौजे वासनगावचा रहिवाशी होता. काही वर्शापुर्वी त्याचे लग्न झाले होते. तो लातूर सोडून रोजगारासाठी बार्शी येथे आला होता. तो शहरातील णका हॉटेलमध्ये वेटरचे काम करत होता. तो दारूच्या व्यसन होता. दारू पिणे , पार्टय करणे , याचबरोबर वेश्यागमन करणे असा छेदीक होता. दरम्यान ग्रामपंचायत निवडणूकीसाठी तो आपल्या मुळ गावी आला होता.अंबटशौकिन आसलेल्या मदनला बऱ्याच दलाल महिलांची ओळख होती. १९ उिसेंबर रोजी दुपारी दारू पिल्यानंतर मदनला कामवासनेची इच्छा झाली. दरम्यान त्यांने एका महिलेला संर्पक केली. तेंव्हा सदरील महिलेने नंदनिला औसा रोडवरील वासनगाव शिवारात आणले. आरोपी मनोज कदम यास फोन करून बोलावून घेतले आणि ह्या दोघांची भेट करून दिल्यानंतर आरोपी मनोज कदम याच्या गाडीवर बसून राजीव गांधी चौक येथून वासनगाव शिवारात घेऊन गेला असता त्या महिलेला आणखीन काही लोक दिसल्यामुळे त्या महिलेला असा संशय आला की हा माणूस एकटा नसून अनेक लोक आहेत असा तिचा भास झाला व दोघांमध्ये भांडण सुरू झाले त्यावेळी महीला पळून जात होती त्यामळे त्या महिलेला पकडण्यासाठी धावत जाऊन तिला पकडले आणि रागाच्या भरात तिच्या डोक्यात दगड घालून ठार मारण्यात आले. आहे सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांचे नेतृत्वात पोलीस अंमलदार राजेंद्र टेकाळे, रामहरी भोसले, प्रकाश भोसले, नवनाथ हासबे, राजेश कंचे, तुराब पठाण चालक चंद्रकांत केंद्रे यांनी केली आहे.

## प्रेमाच्या चक्रव्युहात रखेलीच्या...

राग येत होता. या कारणातून त्या बाप लेकात दररोज हाणामारी भांडणे होत होती. अफजल बागवान यांनी त्याला सांगितले की तु जर असाच वागणार असशील तर तु माझ्या घरात थांबू नकोस तु घरातून बाहेर पड. अफजल हे मार्केटमध्ये भाजीपाल्याचे तसेच कांदा बटाटेचा व्यापार होता.त्याची आर्थिक परिस्थीती तशी चांगली होती. मुलाने व्यापारात लक्ष घालावे असे त्यांना वाटत होते.त्यातच मुलाचे लफडे त्यात तो वाया जाणार याची त्यांना खात्री होती.कारण त्या मुलीची आईने अफजल याच्याकडून बराच आर्थिक फायदा करून घेतला होता.तसा फायदा भविष्यात त्या मुलीने आपला मुलाचा घेऊ नये असे त्यांना वाटत होते.त्यातच ते दोघे ही लग्न करणार असल्याने समाजात एक वेगळाच संदेश जाईल याची भिती ही त्यांना होती. सोहेलने आपल्या मुलीशी लग्न करावे असे तिच्या आईला वाटत होते. त्यामुळे तिने कधी त्याच्या प्रेमसंबंधाला विरोध केला नाही. याबाबत अफजल यांनी आपल्या रखेलीला ही दम देऊन सांगितले की, तुझ्या मुलीला माझ्या मुलापासून लांब राहयला सांग.तुझे माझे काय संबंध आहेत ते जगाला माहित आहे.त्यामुळे त्या दोघांनी जवळ येऊ नये त्यामुळे समाजात नाचक्की होईल तरीही ती ऐकत नव्हती.आपल्या मुलीने सोहेलशी लग्न करावे म्हणून ती आपल्या मुलीला व मुलाला फुस लावीत होती.त्यामुळे ती मुलगी ही सोहेलचा नाद सोडत नव्हती. ती जरी अल्पवयीन असली तरी तिला सर्व काही कळत होते समजत होते.त्यामुळे तिला कुठल्या ही परिस्थीतीत आईने सांगितल्या प्रमाणे सोहेलशी लग्न करायचे होते. तिने व तिच्या आईने मिळून सोहेलला सांगितले की जर तुझ्या बापाचा तुमच्या लग्नाला विरोध असेल आणि ते सांगून ही ऐकत नसतील तर त्यांना तुमच्या मार्गातून संपवून टाक.या गोष्टीला सोहेलही तयार झाला. त्याला आपल्या बापाचा ही राग आलेला होता.त्यांनी केलेले प्रेम आणि आपण केलेले लफडे काय असा तो अर्थ काढत होता. वडिलांना आपल्या मार्गातून बाजुला केले तर आपल्याला तिच्याशी लग्न करता येईल याची खात्री त्याला झाली होती. त्याची प्रियेसी, तो आणि तिचा भाऊ यांनी मिळून एक प्लॅन केला. त्या प्लॅननुसार त्यांनी वडिल अफजल बागवान यांना संपवायचे ठरविले. ठरलेल्या प्लॅनप्रमाणे ती अल्पवयीन मुलगी आणि तिचा अल्पवयीन भाऊ हे लातूरहून पंढरपूरला आल.त्यांनी बसस्थानक शेजारी सोहेल याची भेट घेऊन त्याला परत प्लॅन समजावून सांगितला. त्यानंतर त्या मुलीने अणि तिच्या भावाने अफजल बागवान याची भेट घेतली. त्यांना कासेगाव येथे आपल्या मामाकडे जायचे आहे असे सांगून त्यांना रिक्षात घेतले. ते तिघेजण रिक्षाने कासेगाव येथे जात असताना ठरलेल्या ठिकाणी मुद्दाम रिक्षा थांबविली.त्या ठिकाणी त्या मुलीने व तिच्या भावाने अफजल याच्याशी वाद घालायला सुरूवात करून त्यांच्या लग्नावरून भांडण काढले.अफजल हे त्या दोघांना नातेसंबंध समजावून सांगत असताना त्या अल्पवयीन मुलाने अफजल याच्या अंगावर हात टाकला.त्यामुळे त्यांनी त्याला रिक्षातच दोन कानाखाली लावली. या झटापटीत त्यामुलीने व तिच्या भावाने परत अफजल यांना रिक्षातून बाहेर ओढून मारहाण करीत खाली पाडले.ते रिक्षातून उतरताच त्याची भांडणे बघून त्या रिक्षावाल्याने तेथून काढता पाय घेतला.रात्रीचे ८ ते ९ वाजले असतील त्यामुळे त्या रस्त्यावर वर्दळ ही तितकी म्हणावी तशी नव्हती.याच संधीचा फायदा घेत त्या दोघांनी त्याचा गळा आवळून धरला.ते तडफडत असताना त्यांनी आधिक जोर लावला. ते त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत असताना त्या अल्पवयीन मुलाने बाजुला पडलेला दगड उचलला आणि त्यांच्या डोकीत घातला.त्यासरशी त्याचे डोके फुटून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला.त्यात जागीच त्यांचा मृत्यू झाला.त्या दोघांचे काम झाले होते.त्याच वेळी तेथे दबा धरून बसलेल्या सोहेलला त्यांनी हाक मारली.तो रस्त्याकडील झाडाझुडूपातून बाहेर रस्त्यावर आला.त्याने येताना आपल्या बरोबर पेट्रोलचा कॅन आणलेला होता.तो कॅन त्याने आपल्या वडिलाच्या मृतदेहावर ओतून त्यांना लगेच पेटवून दिले.त्याचा मृतदेह जाळूनच ते तिघे ही तेथून निघून गेले. दुसऱ्या दिवशी त्या रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांना रस्त्याच्या कडेला अर्धवट जळालेला मृतदेह दिसून आल्यावर त्यांनी या घटनेची माहिती पंढरपूर तालुका ग्रामीण पोलीसांना दिली.पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा करून अर्धवट जळालेला मृतदेह उतरीय तपासणीसाठी पंढरपुर येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला.घटनास्थळी संशयीत आरोपीनी कोणताच पुरावा ठेवलेला नव्हता.त्यामुळे हा मृतदेह कोणाचा याबद्दल संभ्रम निर्माण झाला होता. या घटनेला दोन तीन दिवस उलटून गेले होते.दोन दिवस झाले तरी अफजल बागवान घरी आले नसल्याने त्याच्या पत्नीने अफजल बागवान हे बेपत्ता असल्याची फिर्याद पंढरपुर शहर पोलीसात दाखल केली होती.त्यामुळे आजुबाजुच्या परिसरातून कुणी बेपत्ता आहे का? याचा शोध पोलीस घेत असताना ग्रामीण पोलीसांना शहर पोलीस ठाण्यात अफजल बागवान हे ६०तील ग्रहस्थ बेपत्ता असल्याची माहिती मिळाली.डीएनए टेस्टवरून जळालेला मृतदेह हा अफजल बागवान याचा असल्याचे पुरावे पोलीसांना मिळाल्यानंतर पोलीसांनी त्याचा खून कुणी आणि कशासाठी केला याचा शोध घ्यायला सुरूवात केली. घटनेच्या दिवशी एका अल्पवयीन मुलीने व मुलाने त्याना रिक्षात बसवून नेल्याचे अनेकांनी पाहिले होते. यावरून पोलीस त्याचा शोध घेत होते. इकडे पोलीस त्याच्या घरच्या लोकाकडे चौकशी करीत असताना मुलगा सोहेल याच्या बोलण्यात त्यांना विसंगती जाणवत होती. पोलीसांनी त्याच्याकडे आधिक चौकशी केली असता त्याचे अल्पवयीन मुलीशी प्रेमसंबंध असल्याचे व ती मुलगी लातूर येथील वडिल अफजल यांनी ठेवलेल्या बाईची असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. त्यावरून पोलीसांचा सोहेलवर अधिक संशय बळावला. त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याला पोलीसी खाक्या दाखवून बोलते केले असता त्याने आपल्या प्रेमसंबंधाला वडिल अफजल यांचा विरोध असल्याने त्याची अल्पवयीन प्रियेसी व तिचा अल्पवयीन भाऊ यांनी त्याचा गळा दाबून व डोक्यात दगड घालून खून केल्याचे सांगितले. खूनाचा पुरावा नष्ट करणेसाठी आपण स्वत: त्याच्या मृतदेहावर पेट्रोल टाकून त्यांना जाळले असल्याचे त्याने सांगितले. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी लातूर येथून त्या अल्पवयीन मुलीला व तिच्या भावाला ताब्यात घेतले. या घटनेची फिर्याद मयत अफजल बागवान याच्या पत्नीने दिल्याने पोलीसांनी अफजल बागवान (वय ५८) याचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी मुलगा सोहेल बागवान (वय १९) त्याची अल्पवयीन प्रियेसी व तिचा भाऊ याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना पंढरपुर येथील न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने सोहेल बागवान याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली तर त्याची अल्पवयीन प्रियेसी व तिच्या भावाची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली.या घटनेचा पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपुर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस हे करीत आहेत.

## बहिणीवरचा राग तिच्या सासऱ्यावर...

मुला मुलींच्या सहमतीला पालकांचा सहसा विरोध नसतो. मात्र आजकालच्या तरुण तरुणींनी प्रेम करुन पालकांच्या संमतीविना परस्पर केलेल्या प्रेमविवाहाला कोणत्यातरी एका बाजूने विरोध होत असतो. तो विरोध एकतर मुलाच्या अथवा मुलीच्या परिवाराकडून होतो. त्यातून दोन परिवारांमधे कलह निर्माण होतात अणि एखादी विघातक घटना देखील घडते. जळगाव जिल्ह्याच्या चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे या गावी पळून जावून लग्न करणाऱ्या तरुणीच्या भावाने तिच्या सासऱ्याची हत्या केल्याची घटना काही दिवसांपुर्वी उघडकीस आली. चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे या गावी राजेंद्र सोनू चव्हाण हे आपल्या परिवारासह राहतात. पती -पत्नी, दोन मुले आणि दोन मुली असा त्यांचा परिवार आहे. राजेंद्र चव्हाण यांच्या एका मुलाचे व एका मुलीचे लग्न झाले असून ते गुण्यागोविंदाने आपला संसार करत आहेत. लहान मुलगा सचिन हा पुणे येथे कामधंद्यानिमीत्त रहात होता. सचिन राजेंद्र चव्हाण याच्या बहिणीचे गावातील जगदीश दगडू गढरी या तरुणासोबत प्रेमसंबंध निर्माण झाले होते. आपल्या बहिणीचे गावातील जगदीशसोबत असलेले प्रेमसंबंध सचिनसह घरातील सर्वांना समजले होते. दोघांच्या प्रेमसंबंधाची वार्ता गावात देखील पसरली होती. ग्रामीण भागात अशा प्रेमविवाहाच्या घटनांना फार महत्व दिले जाते. शहरी भागात अशा कित्येक घटना घडत असतात. मात्र त्या घटनांची चर्चा फार वेळ तग धरुन रहात नाही. मेहुणबारे गावात या प्रेमसंबंधाची आणि विवाहाची चर्चा मोठ्या प्रमाणात पसरली होती. पुणे येथे नोकरीला असलेला सचिन आपल्या बहीणीला समजावण्यासाठी गावी आला होता. त्याने सुरुवातीला आपल्या बहिणीला समजावण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. सचिनचे म्हणणे तिने ऐकुन घेतले मात्र जगदिशसोबतचे प्रेमसंबंध संपुष्टात आणले नाही. एके दिवशी सचिनची बहिण आणि जगदीश गढरी हे दोघे प्रेमीयुगल गावातून पळून गेले. कुणालाही न भिता दोघांनी आपला संसार सुरु केला. परस्पर लग्न लावून घेतल्यामुळे चव्हाण परिवाराला गावात आपली बदनामी झाल्याची खंत सतावत होती. गावातील आणि गल्लीतील लोक मारत असलेले छुपे टोमणे चव्हाण परिवाराच्या मनाला असह्य वेदना देणारे ठरत होते. आपलया आईवडीलांना होणारे दुख: सचिनला बघवत नव्हते. तुम्ही दोघे भाऊ असूनदेखील काही करु शकले नाही असे गावातील लोक सचिनसह त्याच्या भावाला अप्रत्यक्ष बोलून दाखवत होते. या सर्व घडामोडींचा परिपाक म्हणून सचिन यास चिड येत होती. या सर्व घडामोडी बघता सचिनच्या आईची मानसिक अवस्था आणि तब्येत बिघडली होती. तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. जगदीश गढरी याचे वडील दगडू वामन गढरी हे नजीकच्या तिरपोळे गावी रहात होते. ते अधूनमधून मेहुणबारे येथे येत होते. दरम्यानच्या कालावधीत सचिन उज्जैन येथे गेला. तेथून त्याने आपल्या सुरक्षेच्या दृष्टीने एक लोखंडी कोयता विकत घेतला. तो कोयता त्याने एका निर्जन ठिकाणी झाडाझुडूपात लपवून ठेवला. एके दिवशी सचिनची आई रेशन दुकानावर धान्य घेण्यासाठी गेली होती. त्यावेळी जगदीशचे वडील दगडू गढरी हे देखील त्याठिकाणी धान्य घेण्यास आले होते. सचिनच्या आईकडे बघून त्यांनी लोकांसमोर तिला टोमणे मारण्यास सुरुवात केली. मी कधीही मेहुणबारे येथे राहण्यास येईल. मला कोण काय बोलतो आणि कोण काय करतो हे मी बघतोच असे बोलून त्यांनी जणू काही चव्हाण परिवाराला चिथावणी दिली. दगडू गढरी यांचे बोलणे ऐकून सचिनची आई व्यथित झाली. तिने घरी आल्यावर हा प्रकार सर्वांना कथन केला. दगडू गढरी यांचे बोलणे सचीन यास व्यथीत करुन गेले. एकतर आपल्या बहिणीला जगदीशने पळवून नेत परस्पर प्रेमविवाह केला. शिवाय जगदीशच्या वडीलांसह लोकांचे टोमणे ऐकून चव्हाण परिवाराला मेल्याहून मेल्यासारखे झाले होते. त्यामुळे सचिन यास दगडू गढरी यांचा देखील खुप राग आला होता. १६ डिसेंबरचा दिवस उजाडला. हा दिवस दगडू गढरी यांच्या जीवनातील अखेरचा दिवस ठरला. या दिवशी सचिन चव्हाण हा मोटारसायकलमधे पेट्रोल भरण्यासाठी पेट्रोल पंपावर गेला. त्याच वेळी त्याला जगदीशचे वडील दगडू गढरी समोर दिसले. दोघांची नजरानजर झाली. दोघांची नजरानजर होताच दगडू गढरी यांनी सचिनकडे खुनशी नजरेने रोखून पाहिले. आपल्याकडे रोखून पाहिल्यामुळे सचिनच्या रागाचा पारा वर चढण्यास वेळ लागला नाही. आज दगडू गढरी यांचा अंत करण्याचे सचिनने मनाशी निश्चित केले. सचिन याने त्याचा मित्र सागर यास फोन केला. दगडू गढरी हे धान्य दुकानात रेशन घेत असल्याचे त्याने सागर यास फोन करुन सांगितले. ते रेशन दुकानातून निघाल्यानंतर मला लागलीच फोन कर असे सचिनने सागरला सांगितले. त्यानंतर झाडाझुडूपात लपवून ठेवलेला कोयता घेण्यास सचिन निघाला. झाडाझुडूपात लपवून ठेवलेला कोयता ताब्यात घेतल्यानंतर सचिन पुढील तयारीला लागला. तो सागरच्या फोनची वाट बघू लागला. काही वेळातच सचिन यास त्याचा मित्र सागरचा फोन आला. दगडू गढरी धान्याचे पोते डोक्यावर घेवून पायी पायी मेहुणबारे गावाच्या दिशेने निघाल्याचा निरोप सागरने सचिन यास दिला. निरोप मिळताच सचिन वाटेत दबा धरुन बसला. दगडू गढरी समोर येताच संतापलेल्या सचिनने हातात कोयता घेत त्यांच्या दिशेने झेप घेतली. काही कळण्याच्या आत दगडू गढरी याच्यावर सचिनच्या हातून कोयत्याचा जोरदार वार झाला. या हल्ल्यात दगडू गढरी रक्ताच्या थारोळ्यात रस्त्यावर कोसळले. त्याच्या हातातील धान्याचे पोते देखील खाली पडले. त्यानंतर सचिनने दगडू गढरी यांच्या मानेवर मागच्या बाजूने कोयत्याचा दुसरा वार केला. या हल्ल्यात दगडू गढरी काही क्षणातच ठार झाले. त्यांच्या जीवनातील तो अंतिम दिवस ठरला. कोयता जागेवरच सोडून सचिनने घटनास्थळावरुन मोटारसायकलने पलायन केले. या घटनेची माहिती समजताच परिसरातील लोकांनी घटनास्थळावर गर्दी केली. काही वेळाने मेहुणबारे पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक विष्णू आव्हाड हे देखील आपल्या सहका-यांसह घटनास्थळी दाखल झाले. दगडू गढरी यांची मान कोयत्याने कापली गेल्याने त्यातून रक्त निघत होते. कायदेशीर कारवाईदरम्यान पोलिस पथकाने दगडू गढरी यांचा मृतदेह ग्रामीण रुग्णालयात रवाना केला. डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मयत घोषीत केले. दगडू वामन गढरी यांच्या हत्येप्रकरणी दिपक दगा गढरी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मेहुणबारे पोलिस स्टेशनला खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. भाग ५ गु.र.न. २७१/२२ भा.द.वि. ३०२, १२० (ब) नुसार संशयीत आरोपी सचिन राजेंद्र चव्हाण याच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होण्यापुर्वीच सहायक पोलिस निरीक्षक विष्णू आव्हाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी संशयीत मारेकरी सचिन चव्हाण याच्या शोधार्थ पथक रवाना केले होते. दगडू गढरी यांच्यावर हल्ला केल्यानंतर कोयता जागेवरच सोडून सचिन धुळे रस्त्याने जामदा गावाच्या दिशेने पळून गेला होता. त्यानंतर शिदवाडी रस्त्याने पोहरे खेडगाव आदी मार्गाने जात असतांना त्याने आपल्या मोबाईलचे सिम काढून घेतले. त्यानंतर तरवाडे रेल्वे स्टेशनवर त्याने मोटारसायकल उभी केली. तरवाडे रेल्वे स्टेशनवरुन त्याने धुळ्याला जाणारी रेल्वे पकडली. रेल्वेने त्याने धुळे शहर गाठले. त्यानंतर पुन्हा रेल्वेने धुळे ते चाळीसगाव असा त्याने प्रवास केला. चाळीसगावला आल्यानंतर त्याला भुसावळला जाणारी रेल्वे दिसली. त्या गाडीत बसून तो भुसावळला आला. रात्रभर त्याने भुसावळ रेल्वे स्टेशनवरच मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी १७ डिसेंबर रोजी सचिन भुसावळ शहरात फिरत राहीला. त्या रात्री त्याने भुसावळ रेल्वे स्टेशनवरच मुक्काम केला. त्यानंतर १८ डिसेंबरला त्याने रेल्वेने पाचोरा व तेथून पुढे नगरदेवळा रेल्वे स्टेशन गाठले. नगरदेवळा स्टेशनवर त्याने आपला मोबाईल काहीवेळासाठी सुरु केला. एका अनोळखी इसमाच्या मोबाईल हॉटस्पॉटच्या मदतीने नेट वापरण्यास त्याने सुरुवात केली. मोबाईल सुरु होताच त्याच्या मागावर असलेल्या पोलिसांना त्याचे लोकेशन समजले. त्यानंतर लागलीच त्याने आपला मोबाईल बंद केला. या काही वेळाच्या कालावधीत पोलिसांना त्याचा सुगावा लागला. तो नगरदेवळा रेल्वे स्टेशन परिसरात भटकत असतांनाच मेहुणबारे पोलिसांची त्याच्या खांद्यावर थाप पडली. पोलिस पथकाने त्याला ताब्यात घेत मेहुणबारे पोलिस स्टेशनला आणले. सहायक पोलिस निरीक्षक विष्णू आव्हाड यांच्यासमक्ष त्याला हजर करण्यात आले. त्याने आपला गुन्हा कबुल करत सर्व घटनाक्रम कथन केला. या गुन्ह्यात त्याला मदत करणारा त्याचा मित्र सागर सुनिल सुर्यवंशी याला देखील अटक करण्यात आली. बहिणीला पळवून नेत तिच्याशी प्रेमविवाह करणा-या जगदीशबद्दल सचिनच्या मनात राग होता. दरम्यानच्या कालावधीत टोमणे मारणाऱ्या त्याच्या वडीलांविषयी देखील सचिनच्या मनात राग निर्माण झाला. त्या रागातूनच त्यांची हत्या घडून आली. सहायक पोलिस निरीक्षक विष्णु आव्हाड व त्यांचे सहकारी पोलिस उप निरीक्षक प्रकाश चव्हाणके, पोलिस उप निरीक्षक राजु सांगळे, पोहेकॉ अरुण पाटील, पोकॉ गोरख चकोर, कमलेश राजपुत, शैलेश माळी, जितु परदेशी, हनुमंत वाघेरे आदींनी या गुन्ह्याच्या तपासकामी सहभाग घेत गुन्हा उघडकीस आणला.

## लग्नासाठी तिने त्याच्यामागे तगादा...

तातडीने घटनास्थळी रवाना झाले. काही वेळातच पथक घटनास्थळी पोहचले .यावेळी घटनास्थळी पोलिसांना एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी मृतदेहाची पाहणी केली असता,तिच्या शरीरावर जवळ ३५ वार केल्याचे दिसत होते. मृतदेह छिन्नविछीन्न अवस्थेत पडला होता, मयत महिला, कोण कुठली? याबाबत काहीही माहिती नव्हती. तिची ओळख पटावी यासाठी पोलिसांनी आजूबाजूला शोध घेतला असता,मृतदेहा जवळ एक आधारकार्ड सापडले. त्या आधारकार्ड वर लातुरचा पत्ता होता. त्याचा आधार घेत पोलिसांनी मयत महिलेची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी आधारकार्ड वरून लातूर येथे मृतक महिलेच्या आईशी संपर्क साधला. तेव्हा मृत महिलेचे नाव रुपांजली संभाजी जाधव असल्याचे समजले. रुपांजली संभाजी जाधव (वय २३) ही महिला लातूर जिल्ह्यातील पत्राचा कटरखाना, बसवाडी, हरमुळ येट्ठे येथे आपल्या आईकडे राहत होती.ती विवाहित असून तिला दोन मुली व एक मुलगा असे तीन मुलं आहेत. तिचे पती बरोबर वाद झाल्याने रुपांजली आपल्या तीन मुलांसह आईकडे राहत होती. ती कामधंदा करून मुलांचे पालनपोषण करत होती.अशी माहिती पोलिसांना समजली. पोलिसांनी रुपांजली जाधव हिच्या प्रेताचा पंचनामा करून मृतदेह कल्याण ग्रामीण रुग्णालयात पोस्टमोर्टम साठी पाठवला. मृतदेहाची ओळख पटली होती पण तिचा खून कोणी केला? याचा थांगपत्ता लागला नव्हता. लातूरहुन रुपांजली मुंबईत कशी पोहचली हे एक कोडेच होते. पोलिसांनी तिच्या नातेवाईकांकडे चौकशी केली असता त्यांना रूपांजली जाधव ही लातूर येथून कामाला जाते असे सांगून गेली होती. तेव्हापासून तिचा मोबाइल बंद असल्याची माहिती समोर आली. तिच्या नावावरून फेसबुक, इन्स्टाग्राम या ॲप्सवर जाऊन तिचे मित्रांचे, नातेवाईकांचे फोटो व माहिती प्राप्त केली. तसेच तिच्या नातेवाईकांनी तिचे कपडे, बुट, पाहून ती रुपांजली असल्याची खात्री वडील संभाजी जाधव यांना झाली. पोलिसांनी तिच्या मोबाइल क्रमांकाचा सीडीआर प्राप्त करून त्यांचे तांत्रीक विश्लेषण केले .तेव्हा रुपांजली जाधव ही चाकण एम. आय. डी. सी. पुणे येथे राहण्यास आली असल्याची माहिती मिळाली. तसेच त्या अनुशंगाने पोलिसानी चाकण एम.आय.डी.सी. परिसरात शोध घेतला असता मयत रूपांजली ही जयराम उत्तरेश्वर चौरे याच्या बरोबर राहत असल्याची माहिती मिळाली .सपोनि शिंगटे यांनी तपास करून जयराम उत्तरेश्वर चौरे (१८) व त्याचा मित्र सुरज गोलू धोटे (२०) या दोघांना एम. आय. डी. सी. चाकण, पुणे या ठिकाणाहून ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आणून त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. ते ऐकून पोलीस ही चक्रावून गेले. रुपांजली संभाजी जाधव (वय २३) ही महिला पती पासून विभक्त झाल्याने आईवडिलांसह लातूर येथे राहत होती. ती रोजगाराच्या शोधत असताना तिची पुणे येथील जयराम उत्तरेश्वर चौरे या तरुणाशी ओळख झाली. दोन वर्षापासून त्यांच्यात प्रेमाचे संबंध होते. जयरामने रुपांजलीला तिच्या सोबत विवाह करण्याचे आश्वासन दिले होते. दोन वर्ष उलटली तरी जयराम विवाह करण्याचे नाव घेत नसल्याने रुपांजलीच्या मनात संशय निर्माण झाला होता. ती प्रियकर जयरामला लग्नासाठी तगादा लावत होती. यामुळे जयराम चिंताग्रस्त झाला होता. त्याला रुपांजली बरोबर विवाह करायचा नव्हता. त्यामुळे तिने आक्रमक पवित्रा घेतला.ती लग्नासाठी सारखी तगादा लावू लागली. त्यामुळे जयराम संतप्त झाला. विवाहासाठी प्रेयसी अडून बसल्याने जयरामने रुपांजलीची हत्या करण्याचा कट रचला. यासाठी मित्र सुरेश धोटे याची मदत घेतली. आपण कल्याण भागात लग्न करण्यासाठी जाऊ असे सांगून त्याने दुचाकीवरुन रुपांजलीला पुणे येथून उल्हासनगर येथे आणले. मंगळसूत्र खरेदीचा बहाणा करुन त्यांनी उल्हासनगर मधील बाजारात दोन चाकू खरेदी केले. त्यानंतर लग्नासाठी आपण एका मंदिरात जाऊ असे म्हणून त्यांनी रुपांजलीला टिटवाळा जवळील रेवती गावच्या जंगलात आणले. तेथे गाफील असलेल्या रुपांजलीला खोल दरीत नेऊन तिचा त्यांनी निर्घृण खून केला. ३५ वार रुपांजलीवर करुन तिला ठार मारुन जयराम, सुरेश घटनास्थळावरुन पळून गेले. टिटवाळा पोलिसांनी तपास करून ४८ तासात या दोघांना अटक केली.

# रस्ते अपघाता वेळी नागरिकांनी सहानुभूती दाखवावी-उपनिरीक्षक काझी



**लातूर/प्रतिनिधी**

मानवी चुकांमुळे रस्ते अपघातावेळी नागरिकांनी सहानुभूतीने मदत कार्य करावे असे आवाहन वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक आवेझ काझी यांनी केले ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा, योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभाग, समाजकार्य विभाग व पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने रेझिंग डे सप्ताह अंतर्गत आयोजित विशेष व्याख्यानांत प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. दिनेश मौने, उपप्राचार्य प्रो.डॉ राजकुमार लखादिवे, पोलीस नाईक प्रदीप स्वामी, शैलेश सुडे, सागर आलापुरे, उपप्राचार्य प्रा.बी.एम.जाधव, पोलीस कॉन्स्टेबल दिलीप राजोळे प्रा.डॉ.कॅप्टन बाळासाहेब गोडबोले, प्रा. डॉ. शिवप्रसाद डोंगरे, प्रा. डॉ. संजय गवई प्रा.डॉ. टी.घनश्याम प्रा. क्षीरसागर आशीष मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना उपनिरीक्षक काझी म्हणाले की, प्रतिवर्षी भारतात दीड लाखाच्या जवळपास रस्ते अपघातात मानवी जीव जातात अतिवेग, ड्रंक अँड ड्राईव्ह, सीडबिल्ड न बांधणे, खड्डे, गतिरोधक, वाहतूक नियमांचे उल्लंघन, बिगर परवानाधारक चालक, वाहनातील बिघाड या व असे अनेक कारणांने रस्ते अपघात घडतात अशावेळी कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून अपघात झालेल्या व्यक्तीला मदत कार्य करावे त्यामुळे मानवी जीव वाचतो. केवळ व्हिडिओ करणे, फोटो काढणे असे निरर्थक उद्योग करत न बसता पोलीस प्रशासनाला कळवणे, नजीकच्या आरोग्य सुविधांचा लाभ घेणे, प्रथमोपचार करणे याकडे अधिक लक्ष दिले जावे, केंद्रीय वाहतूक नियंत्रण शाखेच्या वतीने मदत करणाऱ्या व्यक्तीस प्रोत्साहन पर बक्षीसही दिले जातात अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. या कार्यक्रमाच्या औचित्य साधून सायबर क्राईम या विषयावर मार्गदर्शन करताना पोलीस नाईक प्रदीप स्वामी म्हणाले की, आधुनिकीकरणामुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण सध्याच्या काळात अधिकाधिक वाढले आहे. मोबाईल, लॅपटॉप, कॉम्प्युटरचा वापर यातून प्रत्येक व्यक्तीचा वैयक्तिक डेटा हा लिक होताना दिसतो. शेअर मार्केट, खरेदी विक्रीच्या ॲप, फेसबुक, व्हाट्सअप, नोकरी संदर्भातील ॲप, कर्ज मिळवून देणाऱ्या ॲप स्क्रीन सेवर या व अशा अनेक माध्यमांतून वेब गुन्हेगारी वाढत चाललेली आहे. वेब गुन्हेगार आपल्यावर विवीध माध्यमातून पालत ठेवीत आहे आणि त्यातून चारित्र्यहनन, आर्थिक नुकसान, मनोधैर्याचे खच्चीकरण हे केले जात आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने नेहमी सतर्क, सावधान आणि सुरक्षित रहावे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. दिनेश मोने म्हणाले की, सायबर गुन्हेगारी व रस्ते अपघात यांचे दैनंदिन जीवनातील प्रमाण वाढतेच आहे. मनावर ब्रेक, उत्तम ब्रेक या म्हणीप्रमाणे सर्व क्षेत्रात आपल्या मनावर, भावनांवर नियंत्रण करून आपण स्वतः ला, कुटुंबाला सुरक्षित करून इतरांनाही आपण सुरक्षित ठेवू शकतो. वाहतूक नियंत्रण व सायबर गुन्ह्यासंदर्भातील कठोर अंमलबजावणी व्हायला हवी. कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून आपणही आपल्या अधिकारासोबतच कर्तव्याची जाणीव ठेवायला हवी असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. राजकुमार लखादिवे यांनी केले. कार्यक्रमाचे औचित्य साधून कॉनिस्टेबल दिलीप राजुले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.शिवप्रसाद डोंगरे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा.रमेश तडवी, प्रा.काशीनाथ पवार, प्रा.आशिष क्षीरसागर, बालाजी डावखरे, संदीप मोरे, लांडगे आदींनी परिश्रम घेतले.

# देवणीत पत्रकारांच्या वतीने दर्पणदिन साजरा



**देवणी/प्रतिनीधी**

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृती दिनानिमत्त ६ जानेवारी रोजी देवणी येथील लासोना चौकातील आप्पाजी कॉम्प्लेक्समध्ये पुण्य नगरी पत्रकार कार्यालयात देवणी तालुका पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दीन साजरा करण्यात आला. यावेळी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पष्पहार घालून अभिवादन करण्यात आले या कार्यकर्माला काँग्रेस पार्टीचे देवणी तालुकाध्यक्ष ॲड. अजितराव बेळकोने हे होते तसेच पत्रकार संघाचे अध्यक्ष रमेश कोतवाल, सतीश बिरादार, प्रा.रेवण स्वामी मळभगे, बाबासाहेब उमाटे, दत्ता पाटील, शकील मनियार, जाकिर बागवान, बालाजी कवठाले, लक्ष्मण रणदिवे, बालाजी टाळीकोटे, माधवराव मुर्गे, हसन मोमीन, प्रमोद लासूने, सचिन मंगनाळे, कृष्णा पिंजरे, जयेश ढगे, आनंद अंकुलगे, विक्रम गायकवाड आदी पत्रकार उपस्थित होते. यावेळी अनेक पत्रकारांनी आपले मनोगत व्यक्त केले,यावेळी आग्रो इंडिया दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा.रेवण स्वामी मळभगे यांनी केले तर आभार रमेश कोतवाल यांनी मानले.

# बोरवटीच्या मुख्याध्यापिका श्रीमती काळे विजया सेवानिवृत्त

**लातूर/प्रतिनधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरवटीच्या मुख्याध्यापिका श्रीमती काळे विजया यांना सेवानिवृत्ती निमित्त दि.३१ डिसेंबर रोजी निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी नांदगाव केंद्राचे केंद्र प्रमुख बालाजी कोळी तर प्रमुख पाहुणे म्हणून नांदगाव केंद्रांचे मुख्याध्यापक नजीऊल्ला शेख, बोरवटीच्या सरपंच अनुजा ताई नाथजोगी, उपसरपंच अमोलभैय्या माने, ग्रा.पं.सदस्य श्रीम. शोभाताई, परमेश्वर लकडे संतोष ढमाले, संगिता ताई ढमाले, गणेश नाथजोगी, पोलिस पाटिल वसंत कांबळे, तंटामुक्ती अध्यक्ष जोतिराम लकडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष नरवडे ताई गावातील प्रतिष्ठित नागरिक परमेश्वर लकडे, युनुस शेख,अप्पा धडे, मीराताई, सर्व अंगणवाडी ताई, तांबोळी सर, साईचे मु.अ.श्री. बिराजदार सर.. श्रीम.काळे मडम यांचा पूर्ण परिवार.यांची या कार्यक्रमास अवर्जून उपस्थिती होती.

यावेळी विजया काळे यांना सर्वांनी भरभरुन अशा शुभेच्छा दिल्या. पुढे नंतर विद्यार्थ्यांसह सर्वांनी श्रीम.काळे मडम यांनी दिलेल्या स्नेह भोजनाचा अस्वाद घेतला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती किरण आरदवाड यांनी तर आभारप्रदर्शन श्रीमती मनकर्णा राठोड यांनी मानले.यशस्वितेसाठी श्रीमती कटके प्रतिभा व शाळेतील शिक्षक, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# अष्टपैलू प्रशासकीय अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर विभागीय आयुक्त पदी रुजू

**नवी मुंबई/प्रतिनिधी**



अष्टपैलू प्रशासकीय अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी आज कोकण विभाग महसूल आयुक्त पदाची सूत्रे स्वीकारली. रायगड जिल्हाधिकारी पदावरुन ते पदान्नतीने कोकण आयुक्त या पदावर नियुक्त झाले आहेत. भारतीय प्रशासन सेवेतील २००७ बॅचचे डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी कामगार आयुक्त म्हणूनही काम केले आहे, ठाणे जिल्हाधिकारी असताना डॉ. कल्याणकर यांचा दोनदा उत्कृष्ट जिल्हाधिकारी म्हणून गौरव करण्यात आला होता. ठाणे, रायगड, चंद्रपूर आणि अकोला सारख्या संवेदनशील जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी या पदावर वैशिष्ट्यपूर्ण काम करुन प्रशासनात त्यांनी आपल्या उत्कृष्ट दर्जाच्या कामाचा ठसा उमटवला आहे. डॉ.कल्याणकर यांचा जन्म १० एप्रिल १९६८ झाला असून त्यांनी एलएलएम आणि व्यवस्थापन शास्त्रात डॉक्टरेट पूर्ण केले आहे. सन २००८ ते २०१० या कालावधीत डॉ. कल्याणकर यांनी माजी मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव म्हणून काम पाहिले आहे. २०१४ मध्ये अकोला महानगरपालिका आयुक्त असताना हरित अकोला तसेच अतिक्रमण हटाव मोहिम राबविल्या आहेत. २०१५ मध्ये नागपूर येथे महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाचे व्यवस्थापक पद, चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पद, अशा महत्त्वाच्या पदांवर काम करुन डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी आपल्या कामातून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. स्वच्छ भारत मिशनसाठी पुढाकार, विदर्भातील बल्लारपूर तालुका हागणदारी मुक्त करणे अशा वैशिष्ट्यपूर्ण कामांमुळे डॉ. महेंद्र कल्याणकर यांना शासनामार्फत नेहमीच गौरविण्यात आले आहे. यशवंत पंचायत राज पुरस्कार योजनेत ब्रम्हपुरी पंचायत समितीने राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल तत्कालीन राज्यपाल विद्यासागर राव व ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते डॉ. कल्याणकर यांना पुरस्कार देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्ह्यात प्राथमिक शिक्षणासाठी मिशन नवचेतना पंचायत राज सशक्तीकरण अभियान, कातकरी उत्थान योजना, जलपरिषद, जलयुक्त शिवार, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी यापूर्वी कोकणातील ठाणे आणि रायगड या जिलहयांमध्ये जिल्हाधिकारी म्हणून काम पाहिले आहे तसेच तत्कालीन कोकण महसूल आयुक्तांच्या सेवानिवृत्तीनंतर रिक्त असलेल्या आयुक्त पदाचा अतिरीक्त कार्यभार ही सांभाळला आहे. त्यामुळे त्यांच्या एकंदर वैशिष्ट्यपूर्ण कारकिर्दीचा उपयोग कोकण विभागातील नवनवीन उपक्रम, शासनामार्फत जनतेसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना, विकास कामांना पूर्ण करण्यासाठी होईल अशी अपेक्ष सर्वक्षेत्रांतून व्यक्त केली जात आहे.

# व्हॉईस ऑफ मीडियाची जळकोट तालुका कार्यकारिणी जाहीर

**लातूर/प्रतिनिधी**

व्हॉईस ऑफ मीडिया या पत्रकारांच्या संघटनेची जळकोट तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. या संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी पत्रकार ड. अमोल कळसे यांची, तर सरचिटणीसपदी अजिज मोमीन यांची निवड करण्यात आली आहे. 'लढा पत्रकारिता आणि पत्रकारांसाठीचा' असे ब्रीद घेऊन राष्ट्रीय पातळीवर स्थापन झालेल्या व्हॉईस ऑफ मीडिया या संघटनेचे जाळे अवघ्या वर्षभरात महाराष्ट्रासह २१ राज्यांमध्ये पसरले आहे. संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय सरचिटणीस चंद्रमोहन पुप्पाला, राज्य अध्यक्ष राजा माने व मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया यांच्या सूचनेवरुन जिल्हाध्यक्ष बालाजी फड, सरचिटणीस संगम कोटलवार, कार्याध्यक्ष शहाजी पवार व सुशांत सांगवे यांनी जळकोट तालुका कार्यकारिणी जाहीर केली.

या कार्यकारिणीत अध्यक्षपदी ड. अमोल कळसे, कार्याध्यक्ष माधव होनराव, उपाध्यक्ष संगम डोंगरे व बाळासाहेब शिंदे, सरचिटणीस अजिज मोमीन, सहसरचिटणीस आनंद धुळशेट्टे, कोषाध्यक्ष प्रा. नामदेव राठोड, संघटक विनोद गुरमे, कार्यवाहक राजकुमार धुलशेट्टे, प्रसिद्धी प्रमुख दयानंद गायकवाड, तर सदस्य म्हणून मन्मथस्वामी मठपती यांची नियुक्ती केली आहे. या सर्व पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून स्वागत व अभिनंदन होत आहे.

# खाजगी शिक्षण संस्थांमध्ये महात्मा ज्योतिबा व सावित्रीबाई फुले यांची तसबीर लावण्याची मागणी




**भिवंडी/अभिजित हिरे**

महिला शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांची तसबीर सर्व खाजगी शिक्षण संस्था मध्ये लावणे बंधनकारक करावे अशी मागणी श्री साई सेवा संस्थेच्या शिष्टमंडळाने भिवंडी तहसीलदार आदिक पाटील यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिला शिक्षणाची मुहूर्तमेढ लावली गेल्याने त्यांचे समान सदैव होणे गरजेचे असून, फुले दाम्पत्यांनी केलेल्या त्यागा मुळे आज महिला सशक्त झाली असताना आधुनिक समाज ही गोष्ट विसरत आहे. त्याची जाणीव सर्व समाजाला करून देण्याची गरज असल्याने सर्व खाजगी शिक्षण संस्था, खाजगी शिकवणी संस्था, कौशल्य विकास केंद्र अशा ठिकाणी या महान दाम्पत्यांची तसबीर व त्यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्याचे सक्तीचे करावे अशी मागणी या निवेदनात संस्था अध्यक्षा डॉ स्वाती सिंह यांनी केली आहे. या प्रसंगी संस्थेच्या महिला पदाधिकारी यांच्या सोबत सावित्रीबाई फुले यांच्या पेहरावात असलेली छोटी मुलगी सहभागी झाली होती.

# ११ फेब्रुवारीला वसईत राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन

**वसई/प्रतिनिधी**

सामंजस्य आणि तडजोडीने जीवन सुखी बनवूया, चला आपण लोक न्यायालयाच्या मार्गाने जाऊया! या घोषवाक्यांनी वसई न्यायालयात ११ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे.

वसई तालुका विधी सेवा समिती यांच्याकडून मिळालेली माहिती अशी आहे की राष्ट्रीय लोक न्यायालयामध्ये दिवाणी स्वरूपाची तडजोडीस पात्र फौजदारी स्वरूपाची विवाहित स्वरूपाची १३८ एनआय कायदा चेक संबंधाची अन्वये दाखल झालेली प्रकरणे, बँक वसुली, मोटर अपघात प्रकरणे, नुकसान भरपाई, कौटुंबिक वाद प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, वीज व पाणी विषयक द्यावयाचा प्रकरणाचे, महसुले तसेच अनेक दाखल प्रकरणे इत्यादी तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. तरी सर्व पक्षकारांनी आवाहन करण्यात येत आहे की त्यांनी सदर संधीचा फायदा घ्यावा व आपल्या जास्तीत जास्त प्रकरणे लोक न्यायालयात ठेवण्यासाठी ज्या न्यायालयात प्रलंबित असतील त्या न्यायालयातील अर्ज करावा. तसेच दाखल पूर्व प्रकरणाबाबत तालुका विधी सेवा समितीचे लिपिक एसबी राठोड यांच्याकडे संपर्क साधून अर्ज करावा. सर्व पक्षकारांनी प्रलंबित प्रकरणे समाजास आणि सोडवण्याकरिता व आपली दुरावलेले संबंध पूर्नस्थापित करण्यासाठी राष्ट्रीय लोक अदालतीचा अवश्य लाभ घ्यावा असे आव्हान डॉ. सुधीर देशपांडे जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती वसई यांनी केला आहे.

## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'बी' विरार पुर्व, मुख्य कार्यालय-विरार**

**(दुरध्वनी क्रमांक ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३)**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र | पावती क्रमांक | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | तुळींज-३ | NL03/1143/32 | ५४१५ | सलिम युसुफ शेख | ललित मोटाची देसाई |
| २. | तुळींज-५ | NL05/17/2 | ५४१७ | पंडीत पाटील | निलेश पुरुषोत्तम निखार्गे |
| ३ | तुळींज-१ | NL01/223/39 | ५४१९ | मयुरेश्वर सी. निकटे | रजनीश कन्हैयालाल यादव |
| ४ | तुळींज-१ | NL01/235/3 | ५४२१ | मोहनलाल वक्ताजी परिहार, विद्यादेवी मोहनलाल परिहार | मुकेशकुमार सोहनलाल जैन व लक्ष्मी मुकेशकुमार जैन |
| ५ | तुळींज-७ | NL07/431/3 | ५४२३ | साई कंस्ट्रक्शन | श्यामलाल यादव |
| ६ | तुळींज-७ | NL07/467/27 | ५४२५ | बंशीलाल चौरसिया | सुभाष बरसानू गुप्ता |
| ७ | तुळींज-७ | NL07/236/4 | ५४२७ | महादेव शिंदे | रेवणनाथ सतुभाऊ शिंदे |
| ८ | तुळींज-३ | NL03/278/1 | ५४२९ | आर. बी. तिवारी | सुरेंद्र रामलोचन यादव |
| ९ | तुळींज-३ | NL03/793/33 | ५४३२ | संचिता समिर पवार | शीतल श्रीराम मोंडे व श्रीराम दगडु मोंडु |
| १० | तुळींज-४ | NL04/442/28 | ५४३४ | ओम साई राम डेव्ह. | स्वाती वासुदेव मोरे |
| ११ | तुळींज-२ | NL02/929/17 | ५४३६ | ऋषीनारायण उमाशंकर सिंग | राबिया साजिद अन्सारी |
| १२ | तुळींज-१ | NL01/147/11 | ५४३८ | प्रेमनाथ सोनी | रेनु मुन्नालाल यादव व मुन्नालाल राजेंद्रप्रसाद यादव |
| १३ | तुळींज-२ | NL02/929/39 | ५४४० | ऋषीनारायण उमाशंकर सिंग | मो. साजिद गयूर अन्सारी |
| १४ | तुळींज-३ | NL03/706/208 | ५४४२ | मोहम्मद जमील मोहम्मद खलील खान | रामकुमार श्रीराम यादव |
| १५ | तुळींज-३ | NL03/645/58 | ५४४४ | अनंत लक्ष्मण खसासे | अंकित विजय वेलवणकर |
| १६ | तुळींज-३ | NL03/545/83 | ५४४६ | सुनिल सिताराम बुरटे | सचिन सिताराम बुरटे |
| १७ | तुळींज-३ | NL03/1021/26 | ५४४८ | महेशचंद ठाकूर | कालाचन्द राजबहादुर चन्द |
| १८ | तुळींज-२ | NL02/447/9 | ५४५१ | नसरुद्दीन व जलमुद्दीन | प्रियंका गोविन्द सिंह |
| १९ | तुळींज-४ | NL04/309/1 | ५४५६ | रसबिहारी राम | अलोका राम तिलोक |
| २० | तुळींज-२ | NL02/844/11 | ५४५८ | बृजेश आर. ओझा | एकता अभिषेक दुबे |

जावक क्र. वविशम/कवि/१४०९/२०२२-२०२३
दिनांक : ०२/०१/२०२३

सही/-
**प्र.सहा.आयुक्त**
प्रभाग समिती 'बी' विरार पुर्व
वसई विरार शहर महानगरपालिका

09 To 15 JANUARY 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 1/7/2023 9:22 PM Page 1



# होय ! संभाजी महाराज स्वराज्य रक्षकच होते!!

महापुरुषांचे धर्म जरी वेगवेगळे असले तरी त्यांनी कधीही स्वतःला आपल्या धर्म आणि त्यातील धर्म संस्कृतीत अडकवून घेतलेले नव्हते. त्यांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन समाजाचा आणि देशाचा विकास केला. त्यांचा फक्त एकच धर्म होता आणि तो म्हणजे मनुष्य धर्म! आणि त्याच्या रक्षणासाठीच त्यांनी हयात वेचली मग ते छत्रपती शिवाजी महाराज असोत, छत्रपती संभाजी महाराज असोत की डॉ.बाबासाहेब आंबेडकर असोत त्यांचे धर्म वेगळे असले तरी कार्य मात्र सर्वव्यापी होते. आणि त्यांच्या याच सर्वव्यापी महान कार्यामुळे जगात ते महापुरुष ठरले. दुर्दैवाने अशा महापुरुषांना काही लोक धर्माच्या चौकटीत अडकवून त्यांच्या नावावर आपली राजकीय दुकाने चालवण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे अशा लोकांना लोकशाही आणि संविधान मानणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकानी विरोध करायला हवा. छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक होते आणि त्यांच्या हिंदवी स्वराज्यात प्रत्येक जाती धर्माचा माणूस सुखी होतं सुरक्षित होता. महाराजांच्या सेवेत जसे ब्राह्मण होते तसेच दलीत आणि मुसलमान सुद्धा होते आणि त्या सर्वांना महाराजांनी प्रेमाने आणि आपुलकीने वागवले. महाराजांच्या हिंदवी स्वराज्यात जसे हिंदू सुरक्षित होते तसेच मुस्लिम आणि दलीत सुद्धा सुरक्षित होते प्रजेशी त्यांनी कधीही भेदभाव केला नाही. असे असताना काही बामनाणी त्यांना गो ब्रहमन प्रतिपालक अशी उपाधी देऊन त्यांच्या महान आणि सर्वव्यापी कार्याचा अपमान केला. शिवाजी महाराज हे फक्त गो ब्राह्मण प्रतिपालक असते तर इतर जाती धर्माचे लोक त्यांच्या राज्यात सुरक्षित राहिले असते का? तोच प्रकार काही लोक संभाजी महाराजांच्या बाबतीत करीत आहेत संभाजी राजे जे धर्मवीर होते की स्वराज्य रक्षक होते. यावरून सध्या वाद सुरू आहे. विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी संभाजी महाराज स्वराज्य याना स्वराज्य रक्षक म्हटले आहे. तर मुख्यमंत्री आणि भाजप वाल्यांना संभाजी राजे हे धर्मवीर होते असे वाटते. पण प्रत्येक धर्माचा माणूस हा त्याच्या धर्माचा रक्षक असतो, पण आपल्या धर्माचे रक्षण करताना त्यांनी इतर धर्मियांच्या श्रद्धास्थानाचा अनादर केलेला नसतो. संभाजी महाराजांनी सुधा आपल्या हिंदू धर्माचा स्वाभिमान बाळगताना मुस्लिम दलीत किंवा अन्य धर्मीयांचा कधीही द्वेष केला नाही. औरंगजेब स्वराज्याच्या मुळावर उठला म्हणून शिवाजी किंवा संभाजी महाराजांनी इथल्या मुस्लिमांना त्रास दिला नाही म्हणूनच संभाजी महाराज हे पहिले स्वराज्य रक्षकच आहेत. आणि नंतर धर्मवीर आहेत. त्यांना केवळ धर्मवीर संबोधून हिंदू धर्माच्या चौकटीत बंदिस्त करता येणार नाही. तोच प्रकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बाबतीत आहे. बाबासाहेब जन्माने दलीत होते म्हणून त्यांना केवळ त्यांच्या जातीत अडकवून ठेवणे चुकीचे आहे. बाबासाहेबांनी इथल्या वर्ण व्यवस्थेच्या विरोधात लढा देऊन इथल्या उपेक्षित दलीत आदिवासींना त्यांचे मूलभूत अधिकारी मिळवून दिले त्यांना देशाच्या मूळ प्रवाहात आणून देशाची ताकत वाढवली. वेगवेगळ्या जातिधर्म आणि रुढी परंपरा असलेल्या या देशातील लोकांसाठी सर्व समावेशक आणि सर्वमान्य असे सांविधान लिहले. त्यामुळे बाबासाहेब कुठल्याही एका जातीचे किंवा धर्माचे नाहीत तर ते संपूर्ण देशाचे आणि मानवतेचे दिशादर्शक आहेत. पण आज या सर्व महापुरुषांना जाती धर्माच्या चौकटीत अडकवून त्यांनी ज्या जाती धर्माच्या भिंती तोडल्या होत्या, त्या पुन्हा बांधण्याचे काम इथले काही सत्ताधारी करीत आहेत. त्यामुळे या लोकांना वेळीच भल्याबुऱ्या मार्गाने रोखणे आणि या देशाची एकात्मता आबाधित राखणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. या देशात २014 पासून जे जाती धर्माचे घाणेरडे राजकारण सुरू झालेले आहे, त्यात या देशातील सामान्य माणसाचे हाल होत आहेत. कारण आजच्या विज्ञान युगात जाती धर्माला काडीचीही किंमत नाही. माणूस जाती धर्म शिवाय जगू शकतो हे वास्तव आजच्या पिढीला ठाऊक आहे आणि म्हणूनच आज मोठ्या प्रमाणावर आंतरजातीय विवाह होत आहेत. आजचे तरुण तरुणी आपल्या जोडीदाराची जात किंवा धर्म बघत नाहीत तर तो आर्थिक आणि कौटुंबिक दृष्ट्या आपला जोडीदार होण्यास लायक आहे की नाही याचा विचार करून जोडीदार निवडला जातो. आणि हीच पद्धत योग्य आहे. तेंव्हा लग्नासाठी जात, धर्म, गोत्र, कुंडली या सगळ्या बकवास गोष्टी हळूहळू कालबाह्य बनत चालल्या आहेत. ज्यांची कुंडली जुळत नाही तेही लग्नानंतर सुखाचा संसार करतात आणि ज्या मुलींना मगळ असल्याने ज्यांची लग्न जुळत नाही अशा मुलींनीही लग्न होत आहेत आणि त्यांचे नवरे ७० ते८० वर्षांपर्यंत जगतात तेंव्हा कसल्या जन्म कुंडल्या, कसले मंगळ आणि कसल्या धार्मिक संकल्पना? आजचा माणूस धर्मवीर होण्यापेक्षा कर्मवीर होणे अधिक पसंत करतोय. त्यामुळे महापुरुषांना सुद्धा धर्मवीर म्हणाण्या पेक्षा कर्मवीर म्हणा युगपुरुष म्हणा तीच त्यांची खरी ओळख आहे आणि असायलाच हवी!

# ट्रेंडींग ब्लॅकआऊट अमेरीकेत ठरतंय घातकी!



ट्रेंड आणि सोशल मिडिया यांचे एक घनिष्ट नाते आहे. दर दिवशी काही ना काही नवीन ट्रेंड सोशल मिडियाच्या बाजारात येतच असतो. परंतु त्यातील सर्वच ट्रेंड अर्थपूर्ण, सामाजिक, मजेशीर नसतात काही धोकादायकही असू शकतात. ब्ल्यू व्हेल, पबजीसारखे ऑनलाईन गेम तर जीवघेणे ठरले. सध्या ब्लॅकआऊट चॅलेंज ट्रेंडमध्ये आहे. जे वादात अडकले आहे. आजवर या चॅलेंजमुळे ८० जणांनी आपले प्राण गमावले आहेत, ब्लुमबर्ग बिझनेसवीकच्या अहवालातून माहिती जगासमोर आलेली आहे. ब्लॅक आऊट चॅलेंजमध्ये एखाद्या व्यक्तीला बेशुद्ध होईपर्यंत म्हणजेच डोळ्यासमोर अंधार होई पर्यंत श्वास रोखून धरण्यास सांगितले जाते. युएसमधील शहरांमध्ये हे चॅलेंज टिकटॉकच्या माध्यमातून व्हायरल झाले होते. हे चॅलेंज पूर्ण करण्याच्या नादात आजवर अनेक लहान मुले आणि तरुण व्यक्तींनी जीव गमावला आहे.

**दिशायन**

मागील १८ महिन्यांत १२ वर्षे आणि त्यापेक्षा कमी वयाच्या मुलांमध्ये किमान १५ मृत्यू आणि १३ आणि १४ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये पाच मृत्यूंची नोंद झाली आहे. १० वर्षीय नायलाह अँडरसन हिच्या मृत्यूनंतर हे ब्लॅकआऊट चॅलेंज प्रकरण जास्त चर्चेत आले आहे. मृत्यू पावलेल्या अनेक मुलांच्या पालकांनी या ब्लॅकआउट चॅलेंज विरुद्ध थेट कोर्टात धाव घेतली आहे. कॅलिफोर्निया येथील एसएमव्हिएलसी अर्थात सोशल मीडिया व्हिक्टिम्स लॉ सेंटर या न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे. ही संस्था सोशल मीडिया कंपन्यांकडून वापरकर्त्यांना होणाऱ्या त्रासावर कायदेशीररित्या लढा देते. अमेरिकी कायद्यानुसार कलम २३० मध्ये एक तरतूद असे सांगते की सोशल मीडिया किंवा अन्य कोणत्याही इंटरनेट मंचावर उपलब्ध असणारी सामग्री ही ज्या व्यक्तीने तयार केली आहे त्या माहितीसाठी ती व्यक्ती वगळता इतर कोणीही प्रवक्ता म्हणून गृहीत धरला जाणार नाही. तसेच त्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे सुद्धा यासाठी उत्तरदायित्व नसेल. याचा अर्थ असा आहे की टिकटॉक सारखी कंपनी, जे एक व्यासपीठ आहे जिथे अन्य युजर्सकडून सामग्री पोस्ट केली जाते. तर त्या सामग्रीची जबाबदारी ही टिकटॉकची असणार नाही. ब्लॅकआउट चॅलेंजमध्ये हेच कलम २३० टिकटॉकच्या बाजूने फायद्याचे ठरले. दरम्यान भारतात सुद्धा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर करण्यात येणाऱ्या सामग्रीबाबत काही सामान्य नियम वगळल्यास अशा चॅलेंजच्या बाबत फार कठोर कायदे दिसत नाहीत. बाल पोर्नोग्राफीचा अपवाद वगळल्यास अनेक आक्षेपार्ह्य व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात.

अशावेळी पालकांनी सतर्क राहून आपल्या पाल्याकडून नेमका काय कॉन्टेन्ट ऑनलाईन पाहिला जात आहे याकडे लक्ष देणे महत्त्वाचे ठरते. जर आपल्याला आक्षेपार्ह्य व्हिडीओ किंवा चॅलेंज ऑनलाईन दिसल्यास अशी सामग्री रिपोर्ट करता येते. मुलांकडे मोबाईल देताना त्यातील किड मोड सुरू करा. जेणेकरून मुलांपर्यत कोणतीही चुकीची माहिती पोहोचणार नाही. तसेच इतर सोशल मिडिया प्लॅटफॉर्मचे किड मोड सुरू ठेवा. मात्र किडमोडवरही काही आक्षेपार्ह सामग्री दिसत असल्यास त्वरित रिपोर्ट पर्याय क्लिक करा आणि त्याबाबत तक्रार करा. त्यासह मुलांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवून त्यांच्याशी सध्याच्या विविध घडामोडींवर गप्पा मारा, त्यांची मते समजून घ्या, त्यांचे विचार जाणा, त्यांच्या एखाद्या गोष्टीकडे बघण्याचा दृष्टीकोन समजून घ्या. जेणेकरून ते नेमके कोणत्या मार्गाने जीवनाचा प्रवास करत आहेत हे तुमच्या लक्षात येईल. यावरुन तुमचे मूल कोणत्या गेम, चॅलेंज किंवा सोशल मिडियाच्या आहारी गेले तर नाही ना हेही समजेल. वेळीच समजल्याने त्यावर उपाययोजना करता येऊ शकतात.

# गांधी विचारांचे महत्त्व कालातीत-अशोक जैन

## गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे आयोजित नॅशनल गांधियन लिडरशीप कॅम्पचा समारोप



**जळगाव/प्रतिनिधी**

देशाने आजादी का अमृत महोत्सव साजरा केला. या स्वातंत्र्याच्या ७५ वर्ष आणि त्यापूर्वीची ७५ वर्ष अशी मिळून १५० वर्षापूर्वीच्या महात्मा गांधीजींच्या विचारांची, संस्कारांची आजही गरज आहे. महात्मा गांधीजींच्या विचारांचे महत्त्व आजही, भविष्यातही महत्त्वपूर्ण असून ते जगमान्य आणि कालातीत आहेत. संपूर्ण जगाला गांधीजींना सांगितलेल्या मार्गावर चालण्याशिवाय पर्याय नाही. महात्मा गांधीजींच्या विश्वस्त भावनेतून समाजाकडे बघून गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे आयोजित नॅशनल गांधियन लिडरशीप कॅम्पमधील सहभागी अभ्यासकांनी कार्य करावे'; असे मार्गदर्शन जैन इरिगेशनचे अध्यक्ष तथा गांधी रिसर्च फाऊंडेशनचे संचालक अशोक जैन यांनी केले. गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे गांधी तीर्थ येथे आयोजीत नॅशनल गांधीयन लिडरशीप कॅम्पचा समारोपाप्रसंगी सहभागी विद्यार्थी व अभ्यासकांशी प्रश्नोत्तर स्वरूपात साधलेल्या सुसंवादावेळी अशोक जैन बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर ज्येष्ठ गांधीयन अब्दुलभाई, गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या रिसर्च डीन प्रो. गीता धर्मपाल उपस्थितीत होते. सुसंवादाच्या सुरूवातीला अशोक जैन यांच्याहस्ते महात्मा गांधीजींच्या पुतळ्याला माल्यार्पण करण्यात आले.

यानंतर पी. जी. डिप्लोमाचे विद्यार्थी शिवाजी कोकणे, अमनकुमार वर्मा, जयश्री देशमुख यांच्याहस्ते अशोक जैन, गीता धर्मपाल, अब्दुलभाई यांचा सुतीहाराने सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नॅशनल गांधीयन लिडरशीप कॅम्पमध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. जम्मू काश्मीर, बिहार, तेलंगणा, झारखंड, गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल यासह संपूर्ण भारतातून व नेपाळ या देशातून ५६ विद्यार्थ्यांनी नॅशनल गांधियन लिडरशीप कॅम्पमध्ये सहभाग घेतला. दि. २१ डिसेंबर ते १ जानेवारी या १२ दिवसातील आलेले अनुभव विद्यार्थ्यांनी मांडले. त्यात बिहारमधील कुमार हर्षवर्धन भारद्वाज याने, बारा दिवसांचा प्रवास थांबला नसून राष्ट्रनिर्माणाच्या कार्याच्या प्रवासाची सुरवात झाल्याचे सांगितले. मोहनदास ते महात्मा ही देशप्रेमाची ऊर्जा प्रत्येकाच्या मनात जागृत करण्यासाठी हा कॅम्प महत्त्वपूर्ण ठरला असून स्वत:मध्ये बदल केला तर देशात नक्कीच बदल करता येईल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तर रितीका राजपूत हिने आत्मबलाची साधना हेच अंतिम सत्य आहे ते या कॅम्पमध्ये पाहता आले.

'पर्यावरण जीवनशैलीतून नर का नारायण' होता येते याची दिशा कॅम्पमध्ये मिळाली. महात्मा गांधीजींचे विचार सार्थकी ठरविण्यासाठी प्रत्येकाने करून पाहिले तरच साध्य होईल अशी आशा व्यक्त केली. कुठल्याही समस्येच्या निराकरण करण्यासाठी वेगळी दृष्टी याठिकाणी मिळाली असून त्यादृष्टीने समाजात प्रयत्न केले तर अहिंसात्मक बदल घडवून आणता येतील असा विश्वास राजपूत हिने व्यक्त केला. यासह तेलंगणाची प्रणवती, उत्तरप्रदेशमधील राहूल सिंग यांनीही नॅशनल गांधीयन लिडरशीप कॅम्प मधील महात्मा गांधीजींच्या विचारांचे संचित याविषयी मनोगत व्यक्त केले. गांधी लिडरशिप कॅम्प आयोजनाबाबत विद्यार्थ्यांकडून प्रश्नाला उत्तर देताना अशोक जैन म्हणाले की, जैन उद्योग समूहाचे संस्थापक श्रद्धेय भवरलालजी जैन यांच्यावर आई गौराई, वडिल हिरालाल, पंडीत जवाहरलाल नेहरू, टाटा व महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव होता. यावर प्रत्यक्ष काम करताना कांताईंची त्यांना भरभक्कम साथ मिळाली. जैन उद्योग समूहाची सर्व उत्पादने ही शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणण्यासाठी असून गांधीजींच्या विश्वस्त या संस्कारातूनच समाजाकडे पाहिले जाते. श्रद्धेय भवरलालजी जैन म्हणायचे, मी पुर्ण गांधीयन होऊ शकलो नाही, मात्र येणाऱ्या पिढीला गांधीजींचे विचार समजावे' यासाठीच गांधी तीर्थसह गांधी लिडरशीप कॅम्पचे आयोजन आहे. युवापिढीवर गांधीजींचा प्रभाव कसा या प्रश्नांवर कुटुंबातील उदाहरण अशोक जैन यांनी दिले. श्रद्धेय भवरलालजी जैन हे नातवांसोबतच जास्त वेळ घालवत त्यामुळे त्यांचा नातवांवर प्रभाव पडला यातून गांधी विचारांचा संस्कार त्यांच्यावर झाल्याचे अशोक जैन यांनी सांगते. गांधी विचारातून समाज घडविण्यासाठी कार्य करण्याची ईच्छा असेल तर सहकार्य करण्याचे आश्वासनही विद्यार्थ्यांना त्यांनी यावेळी दिले. प्रास्ताविक कु. रिती शहा यांनी केले. सूत्रसंचालन नितीन चोपडा यांनी केले. आभार डॉ. अश्विन झाला यांनी मानले. इसलिए राह संघर्ष की हम चुने... भारत के नौजवान हम इस देश की शान.. या गीतांनी नॅशनल लिडरशीप कॅम्पचा समारोप झाला.

### नेतृत्वगुणांसह स्वावलंबनाची दिशा देणारा कॅम्प

नॅशनल गांधीयन लिडरशीप कॅम्पमध्ये गुजराथ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुदर्शन अय्यंगार, कल्याण अक्कीपेड्डी, तृप्ती पारिख, दिलीप कुलकर्णी, देवाजी तोफा, रमेश पटेल, डॉ.उल्हास जाजू, डॉ. अश्विन झाला यांसारखे विविध वक्तांनी मार्गदर्शन केले. ग्रामस्वराजावरासाठी स्वावलंबी समाज, नेतृत्वगुण आणि पॅनेल चर्चा, मानवतेसाठी योगदान, शांतता खेळ अशा विविध पद्धती वापरून त्यांची निर्मिती करणे यासाठी अभ्यासपूर्ण भाषणे झालीत. सहभागींनी आपआपल्या राज्याचे प्रादेशिक सादरीकरण केले. जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड कंपनीच्या सेवाभावी उपक्रमांनाही भेट सहभागी विद्यार्थी व अभ्यासकांनी दिली.

# महापालिकेमार्फत विशेष उपक्रमा अंतर्गत जननी रथ सुविधा चालू!




**लातूर/प्रतिनिधी**

गरोदर मातांची प्रसूति सुरक्षित व्हावी यासाठी व रुग्णालयात दाखल होण्यासाठी व वापस घरी येताना गरोदर मातांची गैरसोय होवू नये म्हणून लातूर शहर मनपामार्फत विशेष उपक्रम अंतर्गत जननी रथ ही सुविधा चालू करण्यात आली आहे. महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातांना शासकीय रुग्णालयात प्रसूतिसाठी दाखल होण्यासाठी तसेच प्रसूतिनंतर रुग्णालयातून डीसचार्ज झाल्यानंतर वापस शहरातील घरी नेवून सोडण्यासाठी मनपामार्फत स्वतंत्र वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे. दि.६.१.२०२३ पासून ही सुविधा चालू करण्यात आली आहे. सद्यस्थितीत ही सुविधा फक्त दिवसा चालू करण्यात आली आहे. सदरील सुविधा विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय व जिल्हा स्त्री रुग्णालय, लेबर कॉलनी या दोन शासकीय रूग्णालयामध्ये प्रसूतिसाठी दाखल होणाऱ्या गरोदर मातांसाठी चालू करण्यात आली आहे. मनपाच्या प्राथमिक नागरी आरोग्य केंद्राचे सर्व वैद्यकीय अधिकारी, एएनएम, आशा स्वयंसेविका यांना कार्यक्षेत्रातील सर्व गरोदर मातांना प्रसूतिसाठी रुग्णालयात दाखल करणे व डीसचार्ज झाल्यानंतर वापस घरी नेवून सोडणे या सुविधेची माहिती देणे बाबत व सुविधेचा लाभ उपलब्ध करून देणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. तरी लातूर शहरातील सर्व गरोदर मातांनी शासकीय आरोग्य संस्थेत प्रसूतिसाठी दाखल होण्यासाठी जननी रथ सुविधेचा लाभ घ्यावा व वाहनासाठी आपल्या कार्यक्षेत्रातील एएनएम व आशा स्वयंसेविका यांना संपर्क करावा असे आवाहन लातूर शहर मनपामार्फत करण्यात येत आहे.

# सामाजिक संस्थेकडून गरजू लोकांना ब्लँकेट वाटप



**वाराणसी/अजयकुमार उपाध्याय**

वाराणसीमधील राजातालाब जिल्ह्यामध्ये प्रचंड थंडी वाढली असल्यामुळे जिल्हा प्रशासन यांनी गरीब गरजू लोकांना ब्लँकेटचे वाटप करीत आहेत. हे लक्षात घेऊन जिल्ह्यातील सामाजिक संस्था आराजी लाईन क्लब यांनीही पुढाकार घेतला आहे. सध्या थंडीपासून संरक्षण होण्यासाठी आराजी लाईन क्लबचे प्रमुख नगीनासिंह पटेल, डॉ. महेंद्रसिंह पटेल, खंडविकास अधिकारी विजय जायस्वाल, रिन्यू पावर, संस्थेचे प्रोजेक्ट मॅनेजर संदीप कुमार यांच्या उपस्थितीमध्ये पंचायत प्रतिनिधी तथा विभागीय कर्मचारी यांनी गरीज गरजू लोकांना मोफत ब्लँकेटचे वाटप केले. 'राजातालाब' जिल्ह्यामध्ये प्रचंड थंडी वाढली असून आराजी लाईन क्लब अध्यक्ष डॉ. महेंद्रसिंग पटेल यांनी ग्रामीण भागातील गरीब गरजू लोकांना मोफत ब्लँकेटचे वाटप केले. थंडीपासून लोक सुरक्षित रहावे म्हणून विभागात जागोजागी ब्लँकेट वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात खंडविकास अधिकारी विजय जायस्वाल यांचाही सहभाग होता. गरीबाची सेवा करणे हा सगळ्यात मोठा धर्म आहे. या शुद्ध विचाराने जिल्हा प्रशासन यांच्याकडून ब्लँकेट वितरणाचा कार्यक्रम होत असताना शहरातील एका सामाजिक संस्थेने पुढाकार घेऊन ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना एक हजारापेक्षा जास्त ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. कडाक्याच्या थंडीमध्ये गरिबातल्या गरीब व्यक्तीपर्यंत ब्लँकेट पोहोचले पाहिजे याकरिता आराजी लाईन क्लब सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लोकांना ब्लँकेट वाटप करीत होते. गरिबांची सेवा हा सगळ्यात मोठा धर्म आहे. यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने पुढाकार घेतला पाहिजे असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष महेंद्रसिंग पटेल यांनी केला. यावेळी शासकीय अधिकारी विजय जायस्वाल, एस.के. प्रमोद कुमार, संदीप कुमार, मोहम्मद अन्वर, राजकुमार गुप्ता, संजीव सिंग, राहुल जयलाल पाल आदी मान्यवर उपस्थित होते.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

09 To 15 JANUARY 2023 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 1/7/2023 9:23 PM Page 1



# समाजाला आज प्रभू श्रीरामांच्या विचारांची गरज-साध्वी श्रेया भारती



**लातूर/प्रतिनिधी**

प्रभू श्रीरामचंद्रांचे जीवन आदर्श होते. एकवचनी व सत्यवचनी असणारे प्रभू श्रीराम यांच्या विचारांची समाजाला आज गरज आहे, असे प्रतिपादन साध्वी श्रेया भारती यांनी केले. गुरुदेव श्री आशुतोष महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली दिव्य ज्योती जागृती संस्थानच्या वतीने श्री मारवाडी राजस्थान शाळेच्या पाठीमागील मैदानावर आयोजित श्री राम कथेच्या दुसरे दिवशी विवेचन करताना साध्वी श्रेया भारती बोलत होत्या.राम कथा सांगताना साध्वी श्रेया भारती यांनी रामचरितमानसचे विश्लेषण केले. सर्व काळी, प्रत्येक युगात भगवंतांनी धर्म स्थापनेचा संदेश दिलेला आहे. भगवंताला देशाची सीमा नाही, काळाचे बंधनही नाही. सर्व समस्यांचे निराकरण प्रभू श्रीराम यांच्या चरणात आणि त्यांच्या चरित्रात आहे. काम, क्रोध, लोभ, आसक्ती, अहंकार, विविध प्रकारच्या व्याधी, शोक, जन्म-मृत्यू यामुळे सामान्य माणसाला मिळालेल्या जन्माचे महत्त्व लक्षात येत नाही. या मानवाला योग्य मार्गावर आणण्यासाठीच भगवंत अवतार घेतात. साध्वी श्रेया भारती म्हणाल्या की, धर्माच्या स्थापनेसाठी भगवंताने अवतार घेतलेले आहेत. प्रभू श्रीरामांनीही त्याच कारणासाठी अवतार घेतला. भाग्यवान जिवांना त्यांच्या विचारानुसार कार्य करण्याची संधी मिळते. भगवंताने अवतार कार्यात जी तत्व सांगितली त्यांचे पालन आपण केले पाहिजे. प्रभू श्रीरामांचे जीवन आदर्श असेच होते. त्यांचे विचार समाजासाठी अत्यंत आवश्यक आहेत. आज मानव आभासी जगात वावरत आहे. मृगजळाच्या पाठीमागे धावत आहेत. हे अज्ञान असून ज्ञानाचा प्रसार होणे आवश्यक आहे. मानवाला ब्रम्ह ज्ञान होणे गरजेचे आहे. अज्ञान दूर झाले तर मानवातील राक्षसीपणा नष्ट होईल. त्यामुळे मानव हा मानव होईल. मानवी हृदयात ज्ञानाचा प्रकाश पडला तर अंधकार दूर होऊन प्रत्येक मानव सन्मार्गाला लागेल. जगातील अनाचार संपून जाईल, असेही साध्वी म्हणाल्या. कथेच्या दुसऱ्या दिवशी माजी खासदार डॉ.सुनील गायकवाड माजी, नगरसेविका भाग्यश्री कौळखेरे, ज्योती आवस्कर, महेश कौळखेरे, अॅड.संतोष गिल्डा, डॉ.मनोज शिरुरे, डॉ.अश्विन खुर्दळे, पोलीस निरीक्षक पाटील, राजकुमार पंडित, सुरेशचंद्र उदगीरकर, हरिभाऊ गायकवाड, संस्थानचे लातूर समन्वयक स्वामी चिदानंद, स्वामी निरूपानंद यांच्यासह सर्व सेवेकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कथेसाठी मैदानावर भव्य मंडप उभारण्यात आला असून स्क्रीनची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

# एमडीए शैक्षणिक संकुलात रेझिंग डे निमित्त शस्त्र प्रदर्शन

**लातूर/प्रतिनिधी**

रेझिंग डे निमित्त विवेकानंद चौक पोलीस ठाणे व एमडीए फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने कोळपा येथे एमडीए शैक्षणिक संकुलात पोलीस दलातील शस्त्र प्रदर्शन व कायदा-सुव्यवस्था मार्गदर्शन शिबीर संपन्न झाले. या प्रदर्शनात पोलिसांकडे असणारी शस्त्र जवळून पाहता आल्याने विद्यार्थी भारावून गेले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी जितेंद्र जगदाळे, पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक भाऊसाहेब खंदारे सावंत, पोलीस उपनिरीक्षक महेश गळगटे, गणोरकर, अवेज काझी, श्रीमती अनिता अतकरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नलिनी गावडे, सरपंच सिद्धेश्वर शिरगिरे, पत्रकार विजयकुमार स्वामी, पद्माकर सुरवसे, कवायत निर्देशक महेश भारती, वसीम सय्यद, वहीदोद्दीन शेख, पांडुरंग कोकणे, संतोष नारळे यांच्यासह संस्थेचे संचालक दिनेश आंबेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद रामास्वामी, प्राचार्य डॉ.संजय क्षिरसागर व रवी कुऱ्हाडे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कवायत निर्देशक



महेश भारती व वसीम सय्यद यांनी विद्यार्थ्यांना शस्त्रास्त्रांची माहिती दिली. शस्त्रांची नावे, त्यांची मारक क्षमता तसेच ही शस्त्रे किती घातक आहेत? हे देखील त्यांनी सांगितले. कायदा व सुव्यवस्था या संदर्भात सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नलिनी गावडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उपनिरीक्षक अवेज काझी यांनीही विद्यार्थीदशेत वाहतुकीचे नियम पाळणे किती महत्त्वाचे असते हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. संस्थेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते शांततेचे प्रतीक असणारी कबुतरे हवेत सोडण्यात आली. पोलिसांच्या कार्याचे कौतुक करण्यासाठी उपस्थित सर्व मान्यवर व विद्यार्थ्यांनीही त्यांना सलामी दिली. या कार्यक्रमास संस्थेतील प्राध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वलांडी-भालकी-हैद्राबाद बस सेवेचा वलांडी बस स्थानकावर ढोलताशांच्या गजरात जल्लोषात स्वागत



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वलांडी ते हैद्राबाद कर्नाटक राज्य परिवहन महामंडळाच्या भालकी आगाराच्या बसचा शुक्रवार दि.६ जानेवारी रोजी वलांडी बसस्थानकावर प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत ढोलताशांच्या गजरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. कर्नाटक राज्य परिवहन महामंडळाची भालकी आगाराची वलांडी - भालकी -हैद्राबाद ही बस वलांडी बसस्थानकावरुन दररोज सकाळी सहा वाजता हैद्राबाद साठी निघणार असून आळवाई- मेहकर-भालकी-बिदर-जहीराबाद या मार्गे हैद्राबाद येथे साडे अकरा वाजण्याच्या सुमारास पोहचणार आहे. व हैद्राबाद येथील महात्मा गांधी बसस्थानकातून दुपारी साडे बारा वाजता वलांडी कडे निघणार आहे. यावेळी वलांडी - हैद्राबाद बसला वलांडी बसस्थानकावर फुलांच्या माळांनी सजविण्यात येवून ढोलताशांच्या गजरात बसचे जल्लोषात वलांडी बसस्थानकावर स्वागत करण्यात आले. व तसेच बस चालक संजयकुमार गायकवाड व बस वाहक अनिलकुमार बिरादार आणि पब्लिक स्कुलचे अध्यक्ष प्रविण हणमंत शेट्टी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सरपंच राम भंडारे, बालाजी सोनकवडे, हाकीम बौडीवाले, सुनील चिल्लरगे, मुस्ताक खादरी, आसलम ताबोळी, हसन बौडीवाले, ज्ञानोबा भंडारे, साबेर पठाण, महेश भंडारे, रवी गायकवाड, नबीसाब सय्यद, सगीर मोमीन, खंडु तात्या, दयानंद सूर्यवंशी, अझहर शेख, यांच्यासह प्रवासी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वलांडी -भालकी- हैदराबाद ही बस चालू केल्याबद्दल भालकी आगाराचे व्यवस्थापक नवीन शेख व भालकीचे आमदार ईश्वर खंडरे यांचे वलांडीसह या भागातील प्रवाशांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# न्यायधिशाच्या भूमिकेत न रहाता पत्रकार बांधवांनी जनतेची वकीली करण्याचे काम सक्रीयपणे करावे -जयप्रकाश दगडे

**लातूर/प्रतिनिधी**

दर्पण दिनाबाबत पत्रकार व सर्वसामान्य नागरिकांमध्ये संभ्रम आहे. काही पत्रकार बांधव त्यांची जयंती म्हणून साजरा करतात तर काही पत्रकार दर्पण हे पहिल मराठी साप्ताहिक ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकरांनी सुरू केले म्हणून दर्पण दिन साजरा करतात. परंतु ६ जानेवारी हा दर्पण दिनच आहे. असा ठाम विश्वास व्यक्त करीत पत्रकारांनी समाजाच्या प्रश्नासांठी सक्रीयपणे काम करावे. स्पर्धेच्या युगामध्ये सोशल मिडीयाचा वापर वाढल्यामुळे काही प्रमाणात विश्वासार्हता कमी होत असल्याचे म्हटले जात असले तरी झालेल्या जागतिक सर्वेमध्ये ६२ टक्के नागरिकांनी मुद्रिम माध्यमांची विश्वासार्हता टिकून असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे यापुढील कालावधीतही पत्रकार बांधवानी न्यायधिशाच्या भूमिकेत न रहाता सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी जनतेची वकीली करण्याचे काम सक्रीयपणे करावे असे प्रतिपादन पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे यांनी केले. यावेळी दर्पण दिनानिमित्त भाजपा युवा मोर्चा शहर जिल्ह्याच्यावतीने जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या अटल लॅब सभागृहात आयोजित पत्रकार बांधवांचा स्नेहमेळावा व पत्रकारांच्या सन्मान सोहळ्यात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष गुरूनाथ मगे, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप नणंदकर, दिग्विजय काथवटे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना दगडे म्हणाले की, सध्याच्या स्पर्धेच्या युगामध्ये पॅकेजमध्ये पत्रकारिता गुदमरली जात आहे. पूर्वीच्या काळात



जाहीरातीपेक्षा कॉलेटी न्यूजबाबत विचारले जायचे. परंतु आता मात्र पत्रकारितेत पूर्णपणे व्यवसायीकता आलेली आहे. तसेच पत्रकाराच्या नियुक्तीबाबतही अॅग्रीमेंटचा प्रकार समोर आलेला आलेला आहे. कोरोनाच्या काळात जाहीराती कमी झाल्या असे बोलले जात असले तरी जाहीराती कमी झालेल्या नाहीत. त्यामुळे पत्रकारांनी सकारात्मक दृष्टीकोण ठेवून वाटचाल करावी असे आवाहनही त्यांनी यावेळी बोलताना केले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अपर्ण करून व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रामच्या प्रारंभी लातूर शहर व जिल्ह्यातील पत्रकारांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार, लेखणी व डायरी भेट देवनू सन्मान करण्यात आला. तसेच कार्यक्रमाच्या प्रारंभी पत्रकार अभय मिरजकर, संजय देशपांडे, पंकज जैस्वाल, प्रभाकर शिरूरे, दीपक पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. दरम्यान पत्रकारितेत काम करीत असताना अनेक अडचणी आल्या तरी त्यावर मात करीत पत्रकारांनी सक्रीयपणे काम करावे. पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करीत असताना. पत्रकारांनाही अनेक अडचणी येतात. त्या समजून घेवून काम करणार्यांची संख्या कमी झालेली आहे. त्यामुळे यापुढील काळात तरी राजकीय, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील व्यक्तींनी पत्रकारांनी समजून घेवून आपली वाटचाल करावी. असे आवाहन करीत पत्रक व कॉपी पेस्ट पत्रकारिता न करता क्रियटिव्ह पत्रकारिता करावी जेणेकरून स्पर्धेच्या युगातही आपली पत्रकारिता यशस्वीपणे चालू राहील असे मतही ज्येष्ठ पत्रकार नणंदकर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अॅड.गणेश गोजमगुंडे, सागर घोडके,गजेंद्र बोकण, पुनम पांचाळ, राजेश पवार यांच्यासह भाजपा युमोच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार अब्दूल गालिब शेख यांनी मानले.

# सोलापुरात भीषण अपघात; ३५ प्रवासी घेऊन जाणारी बस अचानक पलटली!



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यात एक भीषण अपघाताची घटना घडली आहे. ३५ प्रवासी घेऊन जाणारी बस अचानक पलटी झाली. या अपघातावेळी बसचा वेग कमी होता. मात्र रस्त्यात आलेल्या ऊसाच्या ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात बस रस्त्यावरून खालील बाजूला पलटी झाली. यामुळे अनेक प्रवाशांना दुखापत झाली. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात ही घटना घडली. अपघातानंतर बस पूर्णपणे पलटी झाली. त्यामुळे प्रवाशांच्या जीवावर बेतण्यासारखी स्थिती होती. कुर्डुवाडी येथून वैरागच्या दिशेने ही बस निघाली होती. प्रत्यक्ष दर्शींनी सांगितल्या प्रमाणे बस वेगात नव्हती, मात्र ऊसाच्या ट्रकच्या पुढे जाताना चालकाचे नियंत्रण सुटून हा अपघात झाला. ऊसाचे ट्रॅक्टर रस्त्याच्या मधोमध जात असल्याने एसटी ओव्हरटेक करताना रस्त्याच्या बाजूला असलेल्या शेतात गेली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र लहान मुले आणि महिला किरकोळ जखमी झाले आहेत. दरम्यान ड्रायव्हरचे नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या खाली आली. यावेळी रस्त्यावरील वीजेच्या खांबाला धडक झाल्याने दोन खांब रस्त्यावर पडले.

# जिल्हा परिषद प्रशाला बोरोळ येथील १९ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक

**देवणी/प्रतिनिधी**

नुकत्याच जाहीर झालेल्या इ.८ वी शिष्यवृत्ती परीक्षेच्या शिष्यवृत्ती यादीत १९ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाल्याबद्दल जिल्हा परिषद प्रशाला बोरोळ च्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे व नूतन लोकनियुकत सरपंच व सदस्यांचा सत्कार करण्यात आले. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी पाटील श्रावणी प्रशांत लातूर जिल्हातून सर्वप्रथम-७६.५%, पवळे प्रसाद ज्ञानेश्वर-(लातूर जिल्हातून सर्वद्वितीय)-७५.८%, हूरुचनाळे नम्रता दत्तात्र्य-७१.८%, बागवान साजिद जाफर-७१.८%, बिरादार योगेश्वरी नारायण-७१.१%, कोयले मयुरी नरसिंग-६९.२%, लखनगावे अभिषेक राजकुमार-६५.१%, मुळखेडे अभिनव तुकाराम- ६३.७%, सूर्यवंशी अनुजा तुकाराम-६३.०८%, कोयले संजीवनी शिवाजी.६१.७४%, लखनगावे वेदांत मारोती-६१.०७%, सूर्यवंशी अंबिका



संभाजी-५७.७१%, आयनुले कृष्णा ज्ञानेश्वर-५७.०४%, बिरादार सुप्रिया सूर्यकांत-५३.६९%, धनाडे सुमित दयानंद-५२.३४.%, बोरोळे ज्ञानेश्वरी किशोर-६३.७५, वेदांत वामन कोयले ५९.७३%, पवन राघोबा डब्बे -५७.७१%, महेश आनंद शिंदे -४७.६५%. सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे जिल्हा परिषद प्रशालाचे मुख्याध्यापक राठोड जी आर, लोकनियुक्त सरपंच कृष्णा पाटील,सदस्य प्रताप कोयले, युवराज देवणे, पंढरीनाथ खुळे, अनिल बिरादार, सिताराम पवळे, गोविंद बिरादार, प्रशांत पाटील, अयोध्या धनाडे, शालेय समितीच्या उपाध्यक्षा सुचीता गरड, दयानंद चाफे, गोविंद सुर्यवंशी, शिक्षक तानाजी बालुरे, परमेश्वर माने तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सर्व सदस्य व शिक्षक वृंद यांच्यावतीने सर्व विद्यार्थ्याचे अभिनंदन करुन पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत दिग्विजय कुलकर्णीचे यश

**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणेच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक परीक्षेत दिग्विजय अरूप कुलकर्णी या इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्याने उत्तुंग यश मिळवले. दिग्विजय कुलकर्णी हा येथील केशवराज विद्यालयाचा विद्यार्थी आहे. पूर्व उच्च प्राथमिक परीक्षेत त्याने जिल्ह्यातून ८५ वा क्रमांक प्राप्त केला. दिग्विजयसह इयत्ता पाचवीच्या १२ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे.या विद्यार्थ्यांना शिवशंकर राऊत, आदिनाथ कदम, बबन गायकवाड, श्रीमती तेजस्विनी सांजेकर, श्रीमती कांचन तोडकर, शरद पांचाळ, श्रीमती स्वप्ना सेलूकर, श्रीमती साधना प्रयाग, सुगावे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र आलूरकर,उपाध्यक्ष जितेश चापसी, कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख व संजय गुरव, स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष धनंजय कुलकर्णी- तुंगीकर, शालेय समिती अध्यक्ष शैलेश कुलकर्णी, मुख्याध्यापक प्रदीप कुलकर्णी, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक दिलीप चव्हाण, संदीप देशमुख, बबन गायकवाड, श्रीमती अंजली निर्मळे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे

# आळंद येथे दोन मुलांसह वडिलांनी संपविली जीवनयात्रा

**सोलापूर/प्रतिनिधी**




कर्नाटक राज्यातील कलबुर्गी जिल्ह्यातील आळंद शहरातील नेकार कॉलनीत राहणाऱ्या सिद्धारूढ महामल्लप्पा अक्का (३५) या तरुणाने आपल्या दोन चिमुकल्याणसह विहिरीत उडी टाकून आपली जीवन यात्रा संपविल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली आहे. सिद्धारूढ याने आपल्या मुलांना थेट आळंद एसटी बस डेपो नजीकच्या विहिरीजवळ नेले मोटरसायकल, मोबाईल आणि पादत्राणे बाजूला ठेवून त्यांनी दोन्ही चिमुकल्यांना विहिरीत ढकलून नंतर त्यानेही उडी टाकल्याचे माहितीसमोर आली आहे. गुरुवारी रात्री उशिरापर्यंत घरी न परतल्याने सकाळी शोधाशोध चालू केल्यानंतर एसटी बस डेपो नजीकच्या विहिरीजवळ मोटरसायकल, चप्पल आणि मोबाईल आढळल्याचे पोलिसांना समजल्यानंतर सिद्धारूढ यांनी विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली असावी असा संशय आला त्यानंतर आळंद पोलिसांनी तातडीने अग्निशामक दलास पाचारण केले आणि नागरिकांच्या सहकार्याने शोध कार्यास प्रारंभ केल्यानंतर प्रथम मनीष (११) दुपारी श्रेया (१०) हिचे व सायंकाळी साडेपाचच्या सुमारास सिद्धारूढ याचा मृतदेह आढळल्या. आत्महत्येचे नेमके कारण कळाले नसले तरी त्यांची पत्नी दीर्घ काळापासून आजारी असून उपचार करूनही ती त्या आजारातून बरी झाली नाही आळंदच्या श्रीराम मार्केटमध्ये किराणा दुकान चालवणाऱ्या सिद्धारूढच्या घरात अंतर्गत कलम व्हायचा आणि त्यातूनच त्यांनी आत्महत्या केली असावी असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे हत्तीन गल्ली येथील नेताजी प्राथमिक शाळेत श्रेया ही चौथीच्या वर्गात तर मनीषा हा पाचवी शिकत होता चिमुकल्यांच्या मृत्यूमुळे आळंद शहरावर शोककळा पसरलेली आहे पोलीस अधिक तपास करीत आहेत.

09 To 15 JANUARY 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 1/7/2023 9:23 PM Page 1



पान १ वरून...

## रिकाम टेकड्या नातवाला लागली...

कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या केल्याचा प्रकार काही दिवसांपुर्वी नाशिक जिल्ह्यात घडला. नाशिक जिल्ह्याच्या कळवण तालुक्यातील उंबरदरी शिवारातील वेरुळे या गावी नारायण मोहन कोल्हे हे वयोवृद्ध जेष्ठ नागरिक आणि त्यांची पत्नी सखुबाई असे दोघेजण रहात होते. नारायण कोल्हे यांचे वय ९४ तर त्यांची पत्नी सखुबाई यांचे वय ८८ वर्ष होते. दोघे वृद्ध पती पत्नी या वयात देखील शेती करत होते. शेताजवळच असलेल्या घरात ते दोघे रहात होते. त्यांची मुले आपापल्या परिवारासह गावातील घरात विभक्त रहात होती. सगळे जण विभक्त रहात असले तरी कुणाचा कुणासोबत वाद नव्हता. १ डिसेंबर २०२२ चा तो उजाडला. हा दिवस नारायण आणि सखुबाई यांच्यासाठी त्यांच्या जीवनाचा शेवटचा दिवस ठरला. आयुष्याच्या सायंकाळी या दिवसाची रात्र त्यांच्यासाठी जणू काळरात्र ठरली. दुसऱ्याच दिवशी अर्थात २ डिसेंबरच्या सकाळी नारायण आणि सखुबाई या दोघांचे रक्ताच्या थारोळ्यातील मृतदेह परिसरातील लोकांच्या नजरेस पडले. वयोवृद्ध दाम्पत्याची डोक्यात कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या झाली होती. या घटनेची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरली. या घटनेची माहिती मिळताच अभोणा पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे, सहाय्यक फौजदार कुलकर्णी, हवालदार शिंदे, पोलीस नाईक महाले आदींनी घटनास्थळी धाव घेत पुढील कायदेशीर कारवाई सुरु केली. घटनास्थळ आणि मृतदेहाचा पंचनामा पुर्ण करण्यात आला. दोघांचे मृतदेह उत्तरीय तपासणीकामी कळवण उप जिल्हा रुग्णालयात रवाना करण्यात आले. नाशिक ग्रामीणचे पोलिस अधिक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक नितीन शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने पुढील तपासाला सुरुवात केली. नारायण कोल्हे आणि त्यांची पत्नी सखुबाई या वयोवृद्ध दाम्पत्यांचे कुणाशी काही वाद होते का? घटनेच्या दिवशी त्यांचे कुणासोबत काही भांडण झाले होते का? मिळकतीचा काही वाद होता का? या सर्व बाबी सहायक पोलिस निरीक्षक नितीन शिंदे यांनी तपासून पाहिल्या. मयत दाम्पत्याचे कुणाशीच वैर नसल्याचे चौकशीत आढळून आले. तरी देखील हा खून कुणीतरी जवळच्या व्यक्तीनेच केला असावा या निष्कर्षापर्यंत सहायक पोलिस निरीक्षक नितींन शिंदे आले. या दाम्पत्याच्या संपर्कात कोण कोण होते? कोण त्यांच्या भेटीला नेहमी येत असे? याचा शोध घेण्यात आला. याशिवाय परिस्थितीजन्य आणि तांत्रीक पुरावे संकलीत करण्यात आले. अखेर या दाम्पत्याचा सत्तावीस वर्षाचा नातू राजकुमार हरी कोल्हे यास संशयाच्या बळावर चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. त्याची सखोल चौकशी केली असता त्याने या खूनाची कबुली दिली. बालपणापासून नारायण आणि सखुबाई हे दोघे जण त्यांचा नातू राजकुमार उर्फ काळू हरी कोल्हे याचे लाड करत होते. ते त्याची सर्व प्रकारची हौस पुर्ण करत होते. त्याच्या बालपणापासून ते त्याला खाऊ साठी पैसे देत होते. त्यामुळे राजकुमार आपल्या आजी आजोबांकडे हक्काने पैसे मागत होता. मात्र आता तो तरुण झाला होता आणि त्याच्या आजोबांनी वयाची नव्वदी पार केली होती. शेतीच्या अल्प उत्पन्नातून ते त्यांचा दोघांचा जेवणाचा आणि औषधीचा खर्च जेमतेम काढत होते. कित्येकदा ते मुलांकडूनच पैसे घेत होते. त्यामुळे आजोबा नारायण कोल्हे यांच्याकडे नातू राजकुमारने पॉकेटमनीसाठी पैसे मागणे चुकींचे होते. उलट त्यानेच आजोबा नारायण कोल्हे यांना मदत करणे आवश्यक होते. मात्र तरुणवयात देखील नव्वदी पार केलेल्या आजोबांकडे राजकुमार पॉकेटमनीसाठी पैसे मागत होता. पैसे मिळाले नाही तर तो आजी आजोबांकडे वाद घालत असे. त्याच्या या त्रासाला आजोबा नारायण आणि आजी सखुबाई हे दोघे पार वैतागले होते. वेळप्रसंगी राजकुमार दोघांना शिवीगाळ आणि ठार करण्याची धमकी देखील देत होता. मागणीप्रमाणे लगेच पैसे मिळाले नाही तर तो आजी आजोबांवर चिडचिड करत असे. एकंदरीत दोघांविषयी त्याच्या मनात राग होता. अखेर १ डिसेंबरची काळरात्र आजी आजोबांच्या जीवनात आली. रात्रीची सामसुम झाल्यानंतर हातात कुऱ्हाड घेत राजकुमारने आजी आजोबा नारायण आणि सखुबाई यांचे घर गाठले. दोघे गाढ झोपेत असतांना त्याने घरात प्रवेश केला. घराची रचना त्याला चांगल्याप्रकारे माहित होती. सर्वप्रथम त्याने आजी सखुबाईच्या डोक्यात कुऱ्हाडीचा घाव घातला. ८८ वर्षाची आजी कुऱ्हाडीच्या एकाच घावात गतप्राण झाली. त्यानंतर राजकुमारने आपला मोर्चा आजोबा नारायण यांच्याकडे वळवला. त्यांच्या डोक्यात देखील त्याने कुऱ्हाडीचा घाव घातला. कुऱ्हाडीच्या घावात आजोबा नारायण कोल्हे हे देखील पुढील काही सेकंदात देवाघरी गेले. काही क्षणातच होत्याचे नव्हते झाले. दोघे जण मरण पावल्याची खात्री पटल्यानंतर त्याने दरवाजा उघडत घटनास्थळावरुन पलायन केले. दुसऱ्या दिवशी सकाळी नारायण कोल्हे यांचा मुलगा अमरचंद त्यांना भेटण्यासाठी आला असता मन हेलावणारे दृश्य त्यास दिसले. घरात त्याचे आई वडील रक्ताच्या थारोळ्यात निपचीप पडले होते. अमरचंद याने जोरजोरात रडण्यास सुरुवात केली असता आजुबाजुचे लोक घटनास्थळी धावून आले. त्यांना देखील रक्ताच्या थारोळ्यातील दोघांचे मृतदेह बघण्यास मिळाले. बघता बघता ही वार्ता परिसरात पसरली व त्यानंतर पुढील कायदेशीर कारवाईला सुरुवात झाली. अभोणा पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक नितिन शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ताब्यात घेतलेल्या राजकुमार कोल्हे यास बोलते केल्यानंतर गुन्हा उघडकीस आला. अभोणा पोलिस स्टेशनला गुन्हा रजि. नं. १४९/२०२२ भा.दं.वि. ३०२ नुसार त्याच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्याला अटक करण्यात आली. घटना उघडकीस आल्यानंतर अवघ्या तिन तासातच गुन्हा देखील उघडकीस आला. या गुन्ह्याच्या तपासाबद्दल पोलिस अधिक्षक शहाजी उमप यांनी तपास पथकला १५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. खून झालेल्या वृद्ध दाम्पत्याचा काय गुन्हा होता की त्यांना वृद्धापकाळात हत्येच्या माध्यमातून मरणास सामोरे जावे लागले. कमाई करुन जगण्याच्या काळात राजकुमारला पॉकेटमनीसाठी आजी आजोबांना पैसे मागण्याची सवय का लागली? असे एक ना अनेक प्रश्न या निमीत्ताने उपस्थित होतात. मुलांचे लाड आणि कोडकौतुक पालकांसह आजी आजोबांनी अवश्य करावे मात्र वेळ आणि काळ याचे भान मुलांनी समजून घ्यायला हवे असे या घटनेच्या निमीत्ताने सांगावेसे वाटते. संगत गुण हे देखील या घटनेमागचे कारण असू शकते. आपला तरुण मुलगा कुठे वावरतो? कुणासोबत राहतो. त्याची संगत कशी आहे? हे बघणे गरजेचे ठरते. राजकुमारसारखे गुन्हेगारी मनोवृत्तीचे अनेक तरुण या जगात आहेत. मागचा पुढचा विचार न करता त्यांच्या हातून कोणतातरी गुन्हा घडतो आणि ऐन तारुण्यात त्यांना जेलमधे जाण्याची वेळ येते. यामुळे त्यांच्या माथी गुन्हेगारीचा शिक्का लागतो. त्यांच्यासह त्यांच्या पालकांना देखील मनस्ताप सहन करावा लागतो.

## शेजाऱ्यांशी असलेला वाद विकोपाला...

याच्यासह राहू लागले. त्यांनी घेतलेला बंगला हा मोठा असल्याने पहिल्या मजल्यावर ते कापड व्यापार पिढीसाठी वापरू लागले. त्याच्या मागील बाजूस ते आपल्या कुंटूंबासह राहू लागले. वरचा मजला रिकामा असल्याने त्यांनी तो भाडयाने देणेचा विचार केला. सुरूवातीला त्यांनी आपल्या मारवाडी समाजातील लोकांचा विचार भाडयाने देणेसाठी केला होता. पण त्यांनी घेतलेला बंगला हा स्लम एरियात असल्याने त्यांना भाडेकरू म्हणून त्याच्या समाजातील भाडेकरू मिळाले नाही. त्यांची पत्नी संतोषदेवी या सर्वसामान्य लोकात मिळून मिसळून वागणाऱ्या असल्याने त्या काम नसतेवेळी शेजारी पाजारी जाऊन बसत होत्या. त्यातून त्याची ओळख ही शेजारी राहणाऱ्या संदीप कांबळे आणि महेश कांबळे यांच्या कुंटूबाशी झाली होती. त्यातच त्याची घसट ही संदीप कांबळे यांच्या आई बाळाबाई कांबळे याच्याशी वाढली होती. अलिकडेच राजेशकुमार जोशी यांच्या घरात नवीन भाडेकरू राहयला आले होते. ते भाडेकरू जरा जास्त भांडखोर होते. त्यांना शेजार पाजाऱ्यांनी कचरा केलेला किंवा त्यांनी घातलेला गोंधळ खपत नव्हता. ते नेहमी शेजारी राहणाऱ्या कांबळे कुंटुबियाशी वाद घालत भांडण काढत होते. त्यांचा भांडखोर स्वाभाव हा जोशी यांना माहित होता. पण भाडेकरू म्हणून ते गप्प बसत होते.त्याचेत राहत असलेले भाडेकरू हे नेहमी कांबळे यांच्याबरोबर भांडण काढत होते. त्यामुळे संदीप कांबळे व त्याच्या आईने बाळाबाईने राजेशकुमार जोशी आणि त्याची पत्नी संतोषदेवी याच्याकडे त्या भाडेकरूची तक्रार केली होते. परंतु जोशी हे नेहमी कापड पिढीवर व्यसत असल्याने त्यांनी त्याच्या भांडणाकडे दुर्लक्ष केले. त्यांना आपल्या भाडयाशी मतबल होता. भाडेकरुसाठी ज्या सोई सुविधा पाहिजे त्या सुविधा त्यांनी भाडेकरूला दिल्या होत्या. पण भाडेकरुच भांडखोर असल्याने ते तरी काही करू शकत नव्हते. तरी ही त्याची पत्नी संतोषदेवी यांनी आपल्या भाडेकरूला समजावून सांगितले होते. तरी ही त्या भाडेकरूची किर्र किर्र चालूच होती. ते नेहमी या ना त्या कारणातून कांबळे याच्याशी भांडण काढत होते. त्यामुळे कांबळे हे त्याचेवर चिडून होते. त्यांनी त्या भाडेकरूला सांगितले की तु आमच्या नादाला लागू नकोस, नाही तर तुला सोडणार नाही. गल्ली आमची आहे तु भाडयाने राहयला आला आहेस तु तसाच राह. आमच्या फंदयात पडू नकोस नाही तर तुला जड जाईल. तरी ही तो भाडेकरू काही ऐकत नव्हते. काही तरी भांडणाचे निमित्य काढून ते कांबळे यांच्याशी वाद घालत होते. या प्रकरणात झाले असे की, मालक राहिले बाजुला भाडेकरू आणि शेजाऱ्याची भांडणे लागलेली होती. राजेशकुमार हे तसे सभ्य आणि शांत ग्रहस्थ म्हणून ओळखले जात होते. ते सहसा कोणाच्या आध्यात मध्यात पडत नव्हते. त्याची पत्नी संतोषदेवी यांना पान खाण्याची सवय असल्याने त्या नेहमी पान खाण्यासाठी म्हणून शेजारी जात होत्या. त्यातूनच त्याची घसट कांबळे कुंटुंबियाशी झाली होती. एकदा दोनदा कांबळे आणि त्या भाडेकरूची मारामारी ही झाली होती. याचा राग कांबळे कुंटुबियांना होता. त्यांनी राजेशकुमार जोशी यांना भेटून तुमचा भाडेकरू जास्त भांडखोर आहे विनाकारण आमच्याशी भांडण काढत असतात तुम्ही तुमच्या भाडेकरूना घर खाली करण्यास सांगा नाही तर त्याचे परिणाम वाईट होतील असे सांगितले. राजेशकुमार जोशी यांना ही गोष्ट सांगून दोन तीन महिने झाले होते. तरी ही त्या भाडेकरूचा त्रास कांबळे कुंटुबियांना होता. अखेर संदीप कांबळे यांनी २ जानेवारी २०२३ रोजी रात्री उशिरा फोन करून घरातून बाहेर येण्यास सांगितले. राजेशकुमार हे जिन्यावरून खाली येत असताना संदीप कांबळे आणि महेश कांबळे यांनी त्यांना ओढून मारहाण करण्यास सुरूवात केली. कांबळे याच्याबरोबर आणखीन ७ ते ८ जण होते. त्यांनी जोशी यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करीत घराच्या बाहेर आणले.तुमच्या भाडेकरूंना घर खाली करण्यास का सांगितले नाही म्हणून ते त्यांना तुडवून मारीत होते. नेमके त्या दिवशी त्याचे भाडेकरू हे बाहेर गावी गेले असल्याने ते तेथे नव्हते. आपल्या नवऱ्याला मारहाण होत असताना त्याची पत्नी संतोषदेवी या त्यांना सोडविण्यास आल्या असताना बाळाबाई कांबळे आणि इतर दोघी महिलांनी त्यांना धरून मारहाण करायला सुरूवात केली. त्यात त्या ही गंभीर जखमी झाल्या. गल्लीत आरडाओरडा चालू होता. जोशी हे मारवाडी समजातील असल्याने त्यांच्या घरातून कधी भांडण तंटा होत नव्हता. किंवा त्याच्या घरातून कधी भांडणाचा आवाज देखील आला नव्हता.त्यामुळे आरडा ओरडा होत असल्याने गल्लीतील इतर लोक बाहेर येवून पाहत होते. त्यावेळी संदीप कांबळे आणि महेश कांबळे हे जोशी पती पत्नीना मारहण करीत होते. त्यातच त्याला मार सोडू नकोस असे महेश कांबळे म्हणताच संदीप याने बाजुलाच पडलेली फरशी उचलली आणि राजेशकुमार जोशी याच्या डोक्यात घातली.त्यासरशी त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला आणि ते बेशुध्द पडले. त्या दरम्यान इतरांनी जोशी याच्या खिडकीची काच ही फोडून टाकली. संतोषदेवी यांना ही मारहाण झाल्याने त्याही गंभीर जखमी झाल्या होत्या. या सगळ्या गोंधळात कुणी तरी या घटनेची माहिती इचलकरंजी शहर पोलीस ठाण्याला दिली. या घटनेची माहिती मिळताच गावभाग पोलीस स्टेशनचे पोलीस ही तातडीने महात्मा फुले पुतळ्या शेजारी जोशी याच्या घरासमोर आले. त्यांनी तातडीने गंभीर जखमी असलेल्या जोशी पती पत्नी यांना उपचारासाठी आयजीएम रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्याचेवर उपचार सुरू केले. उपचारादरम्यान संतोषदेवी यांना बरे वाटू लागल्यावर त्यांना लगेच घरी परत पाठविण्यात आले. या दरम्यान सतोंषदेवी जोशी यांनी संदीप कांबळे, महेश कांबळे, बाळाबाई कांबळे याच्यासह आणखीन सात जणांवर मारहाणीचा आणि दशहत माजवून धमकी देण्याचा गुन्हा दाखल केला. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गावभाग पोलीसांनी संदीप कांबळे महेश कांबळे आणि बाळाबाई कांबळे याचेसह ९ जणांना ताब्यात घेऊन त्याचेवर गुन्हा दाखल केला. जोशी याच्या विरूध्द कांबळे कुंटुबियांनी ही तक्रार दाखल केली. दरम्यान आयजीएममध्ये उपचार घेत असलेले राजेशकुमार जोशी याची प्रकृती खालावली असल्याने त्याच्या कुंटुबियांनी त्यांना उपचारासाठी अलायन्स हॉस्पिटल मध्ये दाखल केले.तेथे त्याचेवर उपचार सुरू असताना शुक्रवार दि.७ जानेवारी रोजी त्याचा मृत्यू झाला. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने या गुन्हयात वाढ करून कांबळे कुंटुबियावर खूनाचा गुन्हा दाखल केला. या घटनेची लेखी फिर्याद मयत जोशी याची पत्नी सतोंषदेवी जोशी यांनी गावभाग पोलीसात दिल्याने पोलीसांनी तातडीने हालचाल करीत संदीप कांबळे आणि महो कांबळे यांना ताब्यात घेतले. त्याचेविरूध्द मारहाण आणि दशहतीचा गुन्हा दाखल होता. घटनेचा पंचनामा पोलीसांनी केला.राजेशकुमार देवकिशन जोशी (वय ६२) याच्या खून प्रकरणी संदीप कांबळे महेश कांबळे बाळाबाई कांबळे याचेसह ९ जणांवर भा.दं.वी. कलम ३०२,३४ प्रमाणे वाढ करून त्यांना इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने त्यांना ७ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेत ३ पुरूष आणि ६ महिलांचा सहभाग होता. संदीप कांबळे आणि महेश कांबळे या दोघांना पोलीसांनी ताब्यात घेतल्याने उर्वरीत ७ जण फरारी होते त्याचा शोध पोलीस घेत आहेत. या घटनेचा पुढील तपास गावभाग पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. राजेशकुमार जोशी यांनी चांगल्या ठिकाणचे घर सोडून स्लम एरियात घर घेतले येथेच त्याची फसगत झाली आणि त्यात भाडेकरू ठेऊन त्याची चुक झाली.

## गुटखा खाऊन मंजुनाथ थुंकला...

नववर्षाच्या स्वागताची तयारी तो आणि त्याचे मित्र करीत होते. गावातीलच अजय हिरेमठ याच्याबरोबर त्याची तोंड ओळख होती. दोघे ही नावाने एकमेकाला ओळखत होते. परंतु दोघात कधी बातचीत झालेली नव्हती. मंजुनाथने आखलेल्या पार्टीत अजय हा त्याच्या मित्राच्या ओळखीने सामील झाला होता. मंजुनाथ याला गुटखा खाण्याची सवय होती. तो सारखा गुटखा खाऊन इकडे तिकडे थुंकत होता. नववर्षाच्या स्वागताची पार्टी करीत असताना रविवार दि. १ जानेवारी २०२३ रोजी रात्री मंजुनाथ सुणगार आणि त्याचे मित्र गावाच्या बाहेर पार्टीला गेले होते. त्याच्या आदल्या दिवशी ही त्यांनी सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी पार्टी केली होती. दारू पिणाऱ्याला दारू पिण्यासाठी काही ही कारण लागते त्याप्रमाणे मंजुनाथ आणि त्याच्या मित्रांना रविवार नववर्षाच्या स्वागताची पार्टी करण्याची हुक्की आली. म्हणून ते सगळेजण गावाच्या बाहेर निवांत एका शेतात दारु पिण्यासाठी गेले होते. त्या पार्टीत अजय हिरेमठ ही त्याच्याबरोबर दारू प्यायला आला होता. अजय याचा स्वभाव तसा रागीट आणि भांडखोर होता. त्याला दारूची नशा चढली की तो कोणाबरोबर ही भांडण काढून शिव्या देत होता. त्यामुळे त्याच्या नादाला सहसा कुणी लागत नव्हते. दारूच्या पार्टीत सगळ्यांनी यथेच्छ दारू प्यायली होती.ज्याला त्याला नशा झाली असल्याने कन्नडमध्ये एकमेकाला शिव्या देत ते तेथून निघाले. गावात आल्यावर काही जण पुढे गेले. तर मंजुनाथ आणि अजय हे दोघे सर्कलमधील एका पान टपरीवर गुटखा खाण्यासाठी येऊन थांबले. मंजुनाथने गुटखा घेऊन तोंडात टाकला. तो चघळून बाजुला सारखा थुंकत होता. त्याच्या बाजुलाच अजय हा उभारलेला होता. त्याने ही आपल्या तोंडात गुटखा घातला होता. तो ही गुटखा खाऊन इकडे तिकडे थुंकत होता. मंजुनाथला दारूची नशा चढली होती. तो पान टपरीवाल्याबरोबर इकडच्या तिकडच्या गप्पा मारत बोलत थांबला होता. बोलता बोलता मध्येच तो रस्त्याला थुंकत होता. त्यावेळी रात्रीचे १० वाजले असतील सर्कलमध्ये लोकांची वर्दळ ही थोडी फार कमी होती. मंजुनाथचे बोलण्याकडे लक्ष असल्याने तो कुठे थुंकतो आणि काय करतो हे त्याच्या लक्षात येत नव्हते. त्यातच तो थुंकत असताना त्याचे शितोंडे अजयच्या अंगावर पडत होते. त्यामुळे त्याने त्याला एकदा दोनदा सांगितले की, तु थुंकत आहेस त्याचे शितोडे माझ्या अंगावर पडत आहे. बघून थुंक. एवढे सांगून ही मंजुनाथच्या लक्षात येत नव्हते. त्याने तोडात तोबरा भरला असल्याने येन आनंती तम्मा असे कन्नड मध्ये म्हणत त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. तो परत पान टपरीवाल्याबरोबर बोलत थांबला आणि अधून मधून खालेला गुटखा थुंकू लागला.त्याचे शितोंडे परत अजयच्या अंगावर पडत होते. तो सांगून ही ऐकत नाही म्हटल्यावर अजयने मंजुनाथबरोबर वाद घालायला सुरूवात केली. अगोदरच तो भांडखोर आणि रागीट स्वभावाचा असल्याने तो त्याला मारायला गेला. दोघेही एकमेकांना धक्काबुक्की करत एकमेकाच्या अंगावर जात होते. अजय हा तरूण असल्याने त्याची ताकद जरा जास्त होती. त्याने शिव्या देत मंजुनाथला मारहाण करीत खाली पाडले. त्या दोघांची भांडणे बघून सर्कलमध्ये लोक जमा झाले. परंतु अजय हा जरा गुंडगिरीतील असल्याने त्याची भांडणे सोडवायला कुणी पुढे आले नाही. त्या दोघांची झटापट चालूच होती. अजयने मंजुनाथला एक दोन ठोश्यात खाली पाडले.मंजुनाथच्या हातापायला चांगले खरसटले होते. दोघांची ही दारूची नशा उतरली होती. मंजुनाथ खाली पडल्याचे बघून अजयला राग आवरला नाही.त्याने बाजुलाच पडलेला एक मोठा दगड बघितला आणि तो उचलून मागचा पुढचा विचार न करता मंजुनाथच्या डोक्यात घातला. त्यासरशी त्याचे डोके फुटून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. त्यात जागीच त्याचा मृत्यू झाला. नववर्षाच्या सुरूवातीला पार्टी केल्यानंतर गावातील सर्कलमध्ये खूनाची घटना घडल्याचे लोकांना समजल्यावर लोक सर्कलमध्ये जमू लागले. यात मंजुनाथ्च्या घरचे लोक ही धावत पळत घटनास्थळी आले. लोकांचा जमाव वाढत असताना अजयने तेथून पळ काढला. मजुंनाथच्या आईने, बायका पोरांनी मोठा अक्रोश केला. या घटनेची माहिती कुणी तरी बैलहोंगल पोलीस स्टेशनला दिली. या घटनेची माहिती समजातच तातडीने पोलीस ही घटनास्थळी दाखल झाले. बैलहोंगलचे पोलीस निरीक्षक सालीमणी यांनी घटनास्थळी भेट देवून घटनेची पाहणी केली. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह बैलहोंगलच्या सरकारी दवाखान्यात शवव्छिेदनासाठी पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसांनी पानटपरीवाल्याकडून आणि आजुबाजुच्या लोकांकडून घेतली. या घटनेतील संशयीत आरोपी अजय हिरेमठ हा घटनास्थळावरून पळून गेला असल्याने पोलीसांनी त्याचा शोध सुरू केला. तो गावातून सौदंती रोडने गेला असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीसांनी त्याचा मोबाईल नंबर मिळवून त्याच्या मोबाईल कॉलचे लोकेशन तपासले असता त्याचे लोकेशन बैलहोंगल जवळ दाखवित होते.तो बैलहोंगलमधील आपल्या एका नातेवाईकाकडे लपून बसला असल्याची माहिती पोलीसांना मिळताच पोलीसांनी त्याचा शोध घेवून त्याला ताब्यात घेतले. त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने पोलीसांना घडलेली सगळी हकीकत सांगून आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची फिर्याद मयत मंजुनाथ सुणगार याच्या बायकोने बैलहोंगल पोलीसात दिली असल्याने त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी मंजुनाथ सुणगार (४५) रा. अनिगोळ याच्या खून प्रकरणी अजय हिरेमठ (२५) रा.अनिगोळ याच्या विरोधात आयपीसी कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला बैलहोंगल येथील प्रथम वर्ग कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून या गुन्हयात वापरलेला दगड आणि रक्ताने माखलेला शर्ट जप्त केला. या घटनेचा पुढील तपास बैलहोंगल पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सालीमणी याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

पान ८ वरून...

## बातम्यांबरोबरच राज्याच्या शाश्वत...

दुर्लक्षित दिव्यांगांसाठी स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग, समृद्धी महामार्ग, विदर्भासाठी नागपूर अधिवेशनात विविध निर्णय राज्य शासनाने घेतले. माध्यमांनी ते सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले, असे त्यांनी सांगितले. माध्यम क्षेत्रात गेल्या तीन-साडे तीन दशकात खूप बदल झाले आहेत, असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, पत्रकारांनी या बदलाची नोंद घेतली पाहिजे. अर्थात या बदलांमुळे पत्रकारांचे महत्व कमी होणार नसल्याचेही त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात वृत्तपत्रांनी मोठी भूमिका बजावली. आजही नागरिकांना, वाचकांना खऱ्या अर्थाने सज्ञान करणे आणि लोकशिक्षणाची भूमिका माध्यमांनी पार पाडण्याची गरज आहे. आपल्या समाजापुढील अंमली पदार्थाचा वाढता वापर, नक्षलवाद, दहशतवाद, रोजगार, बदललेल्या कुटुंब व्यवस्था, बाजारू चंगळवाद या समस्यांचा वेध घेऊन माध्यमांनी वस्तुनिष्ठ आणि मार्गदर्शक अशी भूमिका मांडली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी गडचिरोली येथील नक्षलवादाचा बिमोड करण्याची राज्य शासनाची भूमिका असून तेथील नागरिकांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेतले जात असल्याचे सांगितले. यावेळी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग उभारणीत मोलाचा वाटा असणारे श्री. मोपलवार, मनरेगा मध्ये विविध सुधारणा करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करणारे अतिरिक्त मुख्य सचिव श्री. नंदकुमार यांचा विशेष सन्मान मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. अप्रतिम मीडियाच्या वतीने प्रकाश कथले (वर्धा), हेमंत जोशी आणि योगेश त्रिवेदी (मुंबई) यांना चौथा स्तंभ राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याशिवाय, माध्यम उद्योजकता व संपादकीय नेतृत्व, पर्यावरण वृत्त, वने व इको टुरिझम वृत्त, टीव्ही न्यूज चॅनेल टीम लीडर, विकास वृत्त, स्थानिक पर्यटन वृत्त, उद्योग/व्यापार वृत्त, कला-संस्कृती, कृषी, शैक्षणिक, आरोग्य, साहित्य, ग्रामीण विकास, सहकार अशा विविध विभागात पत्रकारांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते अप्रतिम महावक्ता' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. फळे यांनी तर सूत्रसंचालन सोनाली शेटे यांनी केले. आभार विवेक देशपांडे यांनी मानले.

## पत्रकार संरक्षण कायदा हे पत्रकारांचे ...

शत्रू निर्माण होणार नाहीत आणि आपल्याला पत्रकारितेच्या तत्त्वाला मुरडही घालता येणार नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार जगदीश भोवड यांनी यावेळी केले. शुद्धलेखन हा बातमीचा आत्मा असून, आपण नेहमीच बातम्यांद्वारे शुद्धलेखनाच्या सान्निध्यात असतो. आपण जे लिहितो त्याचा समाजमनावर प्रभाव पडत असतो. त्यामुळे आपल्या लेखनात शक्य तितका शुद्धलेखनाचा अवलंब करावा. इतर कुणी आपले लेखन सुधारेल यापेक्षा आपणच आपली बातमी शुद्ध स्वरूपात आणि गोळीबंद स्वरूपात द्यावी. त्यामुळे आपल्या बातम्या प्रसिद्ध होण्यास सुकर होतील आणि बातम्यांचे समाधानही मिळेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार शरद विचारे यांनी याप्रसंगी केले. 'दर्पण' हे देशातील पहिले मराठी नियतकालिक सुरु करणारे स्व. स्व.बाळशास्त्री जांभेकर यांना मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक मानले जात असून, त्यांनी अल्पवयात विविध क्षेत्रात प्रचंड मोलाचे योगदान दिले आहे. यामुळे त्यांच्याबद्दल कृतज्ञता म्हणून त्यांची जयंती सर्वत्र पत्रकार दिन म्हणून साजरी केली जाते. या पार्श्वभूमीवर स्व. जांभेकर यांच्या स्मृतींना उजाळा देण्याबरोबरच, पत्रकारांना सहाय्यभूत ठरेल असे विषय घेऊन आज मार्गदर्शक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे वसई विरार महानगर पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिलराज रोकडे यांनी प्रस्ताविकात सांगितले. पत्रकार संघातर्फे भोवड आणि विचारे या दोघा ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. संघाचे पदाधिकारी विजय खेतले आणि विश्वनाथ कुडू यांनी प्रारंभी पाहुण्यांचा परिचय करून दिला. याप्रसंगी उपस्थित विविध नियतकालिकांच्या महिला संपादिका सौ. सोनल महाडिक, सौ. सुनीता पाटील, सौ. पूजा रोकडे व सौ. कल्पिता भोईर यांचा पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी संघाचे सरचिटणीस शशी करपे, उपाध्यक्ष लक्ष्मण पाटोळे, सुनील घरत, विजय देसाई, प्रसाद जोशी, चंद्रकांत भोईर, जयराज राजीवडे, प्रथमेश तावडे, विपुल पाटील, रुपेश वाडे, मच्छिन्द्र चव्हाण, बबलू गुप्ता, हरिश्चंद्र गायकवाड आदी पत्रकार मोठया संख्येने उपस्थित होते.

## मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या २२व्या...

असलेले तथा आदिवासींच्या बेकायदेशीररित्या बळकावलेल्या जमिनी त्यांना परत मिळवून देणारे राजू पांढरा यांना 'समाज भूषण पुरस्कार', उत्कृष्ट लेख, कविता, मुलाखत यासारख्या विषयांवर कठोर परिश्रम घेऊन कोरोना काळातही बाजारातील अनुकुल परिस्थिती नसताना देखील दर्जेदार दिवाळी अंक काढण्याचे धाडस करणारे सावी' दिवाळी अंकाचे संपादक रमाकांत घुमटेकर यांना महाराष्ट्र राज्यातून दिवाळी अंकाचा 'प्रथम पुरस्कार' व मुळचे केळवे-माहिम येथील भारतीय स्टेट बँकेचे माजी अधिकारी तथा अविचल निष्ठेने आणि ध्येयाने प्रेरीत होऊन आजवर साहित्य क्षेत्राच्या माध्यमातून आपली छाप उमटवणारे 'गंधाली' दिवाळी अंकाचे संपादक डॉ. मधुकर वर्तक यांना महाराष्ट्र राज्यातून दिवाळी अंकाचा 'तृतीय पुरस्कार' देऊन आ. संजय केळकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी दै. प्रहारचे संपादक सुकृत खांडेकर, ज्येष्ठ पत्रकार रामहरी कराड व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ बिरवटकर व्यासपीठावर उपस्थित होते. पालघर जिल्ह्यातील समाजातील विविध क्षेत्रात गौरवास्पद काम करणाऱ्या या ५ जणांवर जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## नाका कामगारांना सुरक्षा किटचे...

मिळाण्यासाठी वसईतील 'एकता कामगार युनियन' ही कामगारांसाठी काम करत आहे. वसईतील पंचवटी नाका, वसई गाव नाका आणि माणिकपूर नाका या ठिकाणी असलेल्या कामगार मजूर अड्डा या ठिकाणी जाऊन कामगारांना सुरक्षा किटचे वाटप करण्यात आले. नाका कामगार यांच्या हितासाठी आम्ही संपूर्ण जिल्हाभर नव्हेच तर महाराष्ट्रभर काम करणार आहोत असे प्रतिपादन एकता कामगार युनियनचे अध्यक्ष सुनील मिश्रा यांनी केले.

## पत्रकारिता लोकशाहीचा चौथा स्तंभ...

कार्यकारी अभियंता म्हणाले सोलापूर जिल्हा परिषद आणि बीट पत्रकारांनी जिल्ह्याच्या चौफर विकासासाठी आपल्या लेखणीच्या माध्यमातून भरीव योगदान दिले आहे. सकारात्मक पत्रकारिता नजरेसमोर ठेवून लिखाण केले जाते त्यामुळे विकासात्मक धोरणामध्ये मोठा वैचारिक निर्णय ठरत असतो. महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेश देशपांडे मनोगत व्यक्त करताना म्हणाले बीट पत्रकारांच्या लेखी मुळे सर्वसामान्यांना न्याय मिळाला प्राथमिक शिक्षण विभागातील एका महिलेला बातमीमुळे पेन्शन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. बातमीची दखल जिल्हा परिषद प्रशासनाने घेतल्याने तात्काळ निकाल मिळत असल्याचे ते म्हणाले प्रशासनाधिकारी गिरीश जाधव यांनी पत्रकार हा समाजाचा आरसा असून वेळोवेळी पत्रकारांनी सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली आहे. जिल्हा परिषद जडणघडणीत पत्रकारांचे लिखाण प्रभावी ठरले आहे. या कार्यक्रमासाठी सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय राज्यघटना सर्व भारतीयांना ...

माध्यमातून प्रचार व प्रसार केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय बहुजन विकास संघटनेचे युवा अध्यक्ष मा. आसिफ शेख यांच्या नेतृत्वाखाली समेळ पाडा, छेडा मार्ग हनुमान, नगर पाटणकर, पार्क, श्री प्रस्थ, मुख्य रस्त्या मार्गे संतोष भवन हनुमान गल्ली धनु बाग शिर्डी नगरचंदन नाका आचोळे तलाव नालासोपारा विरार मुख्य रस्त्या मार्गे सेंट्रल पार्क ओसवाल नगर प्रगती नगर जिजामाता नगर नगीना विजयनगर आंबेडकर नगर टूल्स येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्प व हार अर्पण करून नालासोपारा पूर्व पश्चिम या कार्यक्षेत्रात संविधान निष्ठा यात्रा काढण्यात आली. प्रजा सुराज्य पक्षाचे राष्ट्रीय प्रभारी बच्चुभाई कानोजिया यांनी मार्गदर्शन केले तर प्रजा सुराज्य पक्षाचे प्रदेश अध्यक्ष संजय पवार, प्रजा संजू (भाऊ) तडवी, उपाध्यक्ष, प्रजा सुराज्य पक्ष, कैलास जाधव अध्यक्ष महाराष्ट्र राज्य लालासाहेब लोमटे प्रतिष्ठान, अनिल वाघेला गुजरात प्रभारी, पत्रकार विनायक खर्डे, दिपक पाखरे उपाध्यक्ष वसई विरार शहर महानगर क्षेत्र आदी उपस्थित होते. अविनाश जाधव, सिताराम चौरसिया, कैलास इंगोले काँग्रेस नेते, डी गणेश सचिव कामगार विभाग,दिलीप सकपाळ उपाध्यक्ष प्रजा सुराज्य पक्ष,नायडू साहेब ,बबन वाडकर राजकुमार बौद्ध, संतोष भोने,डॉक्टर ओंकार यादव, मीना तांडेल, गणेश आहिरे, सुनील साळुंखे,नोमान शेख इतर सविधन प्रेमीनी आपला सदरील कार्यक्रमांत सहभागी झाले होते. तसेच पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

09 To 15 JANUARY 2023 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 1/7/2023 9:24 PM Page 1



# सैन्य दलाच्या जवानांप्रमाणे पोलीसांबद्दल जनमानसात आदराची भावना –राज्यपाल



**मुंबई/प्रतिनिधी**

राज्याचे पोलीस दल संपूर्ण देशात सर्वश्रेष्ठ मानले जाते. सैन्य दलांच्या जवानांप्रती लोकांमध्ये जशी आदराची भावना आहे, तशीच भावना राज्याच्या पोलीसांप्रती देखील आहे. करोना प्रकोपाच्या काळात डॉक्टर्स, नर्सेस यांच्या प्रमाणेच राज्यातील पोलीसांनी देखील जीवाची पर्वा न करता कार्य केले त्यामुळे राज्य पोलीस अभिनंदनास पात्र आहेत, असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले. राज्यपाल श्री.कोश्यारी यांच्या प्रमुख उपस्थितीत गोरेगाव मुंबई येथील राज्य राखीव पोलीस दलाच्या मैदानावर महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. गेल्या दहा–वीस वर्षामध्ये पोलीस दलातील आव्हाने वाढली आहेत. सागरी सुरक्षा, नक्षलवाद यांसारखे धोके आहेतच. त्याशिवाय सायबर सुरक्षा, युवकांमध्ये वाढती नशाखोरी आदी नव्या आव्हानांमुळे पोलिसांना दुप्पट सतर्क राहणे गरजेचे आहे. राज्य शासन पोलीस दलाचे आधुनिकीकरण करीत आहे तसेच मोठ्या प्रमाणावर पोलीस भरती देखील होत आहे. पोलीसांनी कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून राज्य तसेच देश अधिक सुरक्षित करावा असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले. आपल्या कृतीतून राज्य पोलिसांनी गीतेतील 'परित्राणाय साधुनां, विनाशाय च दुष्कृताम' हे ब्रीद सार्थक केले असल्याचे त्यांनी सांगितले. दिनांक २ जानेवारी १९६१ रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र पोलीस दलाला पोलीस ध्वज प्रदान केला होता. त्यामुळे २ जानेवारी हा दिवस पोलीस वर्धापन दिन म्हणून साजरा केल्या जातो, असे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. दिनांक १ जानेवारी १८२७ रोजी तत्कालीन गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनी बॉम्बे प्रेसिडेन्सी असताना बॉम्बे डिस्ट्रिक्ट पोलीस दलाची स्थापना केली होती. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीद वाक्य असलेल्या राज्य पोलीस दलाच्या अंतर्गत १२ पोलीस आयुक्तालय व ३७ जिल्हा पोलीस दल असल्याचे त्यांनी सांगितले. पोलिसांतर्फे सायबर गुन्हे रोखण्यासाठी तसेच महिला, लहान मुले व वरिष्ठ नागरिकांसंबंधातील गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी विविध योजना राबविल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. सुरुवातीला राज्यपालांनी वर्धापन दिन संचलनाचे निरीक्षण केले व शिस्तबद्ध संचलनाकडून मानवंदना स्वीकारली. संचलनामध्ये मुंबई पोलीस, राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी, निशाण टोळी, महिला पोलीस व बँड पथक सहभागी झाले होते. यावर्षी बँड पथकाकडून स्वतंत्र वादन, कमांडोज तर्फे मौखिक आदेशाविना सशस्त्र कवायत तसेच श्वानपथकातर्फे गुन्हे अन्वेषण व प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. कार्यक्रमाला बृहनमुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर तसेच मुंबई पोलीस दलातील ज्येष्ठ अधिकारी, सेवानिवृत्त अधिकारी, पोलीस जवान व निमंत्रित उपस्थित होते.

# जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचा संघ नागपूरला महाराष्ट्र ओलंपिक गेम्ससाठी रवाना!



**जळगाव/प्रतिनिधी**

जैन स्पोर्टस् अ‍ॅकॅडमीच्या जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचा संघ महाराष्ट्र ओलंपिक गेम्ससाठी पात्र ठरला आहे. महाराष्ट्र ओलंपिक गेम्स २०२२–२३ च्या स्पर्धा २ ते ६ जानेवारी २०२३ दरम्यान नागपूर येथील मानकापूर स्टेडियममध्ये होणाऱ्या स्पर्धेसाठी हा संघ आपली छाप सोडण्यासाठी रवाना झाला आहे. महाराष्ट्रातून पुरुषांचे आठ संघ पात्र झालेले आहेत. यामध्ये जळगाव, नागपूर, ठाणे, पुणे, ग्रेटर मुंबई, नाशिक, सांगली, पालघर या संघांचा समावेश आहे. जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन चा संघसुद्धा यामध्ये पात्र ठरलेला आहे. जळगावचा पुरुष संघ महाराष्ट्र ओलंपिक गेम्स २०२२–२३ मध्ये सहभागी होणे ही जळगावच्या संघासाठी ऐतिहासिक आणि गौरवाची बाब आहे. जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या संघात शुभम पाटील, प्रणव पाटील, दीपेश पाटील, गोपाल पाटील, उमेर देशपांडे, ओजस सोनवणे, अथर्व शिंदे, देवेश पाटील, सुफियान शेख, किशोर सिंह सिसोदिया यांची निवड झाली आहे. या खेळाडूंसोबत प्रशिक्षक अमोल पाटील, संघ व्यवस्थापक विनीत जोशी हे नागपूरला होणाऱ्या स्पर्धेसाठी रवाना झाले आहे. जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष अतुल जैन, उपाध्यक्ष तेजेंद्र महिंद्रा, सचिव विनीत जोशी, सहसचिव तनुज शर्मा, खजिनदार अरविंद देशपांडे, सदस्य शेखर जाखेटे व जैन स्पोर्टस अ‍ॅकॅडमीचे प्रशिक्षक किशोर सिंह यांनी पुढील स्पर्धेसाठी संघाचे कौतूक केले आहे.

# घरफोड्या करणाऱ्या आरोपींना पोलिसांनी ठोकल्या बेड्या



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने एका आंतर जिल्हा गुन्हेगाराला जेरबंद केले असून त्याच्याकडून चार लाखांचा मुद्देमाल जप्त करून सहा गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. शंकर उर्फ हाड्या मधुकर पवार (२२) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पथक फरार आरोपींना शोधण्यासाठी गस्त घालत असताना मिळालेल्या माहितीवरून आरोपी पवार हा अकलूज येथून पंढरपूरकडे सिल्वर रंगाच्या इंडिका कार ने येत असताना पथकाने पंढरपूर शहरातील सरगम टॉकीज च्या समोर सापळा लावून गाडी पकडली कार मधील चालकास अधिक विश्वासात घेऊन विचारपूस करता त्याने त्याच्या साथीदारासह पंढरपूर शहर व परिसरात, तसेच पुणे जिल्ह्यात, कर्नाटकात घरफोड्या व चोरीचे सहा गुन्हे केल्याचे सांगितले. आरोपी पवार यास पुढील तपास करता पंढरपूर शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. या आरोपीकडून सोन्याचे ८९ ग्रॅमचे दागिने, चांदीचे ५०० ग्रॅमचे दागिने व इंडिका कार असा एकूण ४ लाख १६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अधिक तपास पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी करत आहेत. अटक आरोपी पवार हा गुन्हेगारी पार्श्वभूमीचा असून त्याच्यावर अहमदनगर, पुणे, कर्नाटकात घरफोडी वाहन चोरी यासारखे गुन्हे दाखल आहेत. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक सुबोध जमदाडे यांच्या पथकातील पोलीस अंमलदार शिवाजी घोळवे, बापू शिंदे, मोहिनी भोगे, लालसिंग राठोड, अजय वाघमारे, यश देवकते यांनी केले आहे.

# जगभरातील मराठी माणसाने महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करावे –नितीन गडकरी

**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र ही संतांची, समाजसुधारकांची आणि संशोधकांची भूमी आहे. याप्रमाणेच संपत्ती निर्माण करणाऱ्या मराठी माणसाची देखील भूमी आहे. महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करण्याची जबाबदारी जगभरातील मराठी माणसाची आहे. जगभरातील मराठी माणसाने महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या समृद्ध आणि संपन्न करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केंद्रीय रस्ते, परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

मुंबई येथील नॅशनल स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया, वरळी येथे आयोजित 'मराठी तितुका मेळवावा' या पहिल्या विश्व मराठी संमेलनातील कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उद्योग मंत्री उदय सामंत, मराठी भाषा व शिक्षण मंत्री दीपक केसरकर, मराठी भाषा विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर यांच्यासह श्रीमंत सरदार सरदेसाई, श्रीमती धनश्री सरदेसाई, जपानचे आमदार योगेंद्र पुराणिक, बीएमएफ चे अध्यक्ष संदीप दीक्षित, जर्मन कौन्सुलेटचे प्रतिनिधि डॉ. चव्हाण, श्री. आनंद गानू , श्री विजय पाटील यांसह विविध देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



विश्व मराठी संमेलनाच्या उत्कृष्ट आयोजनासाठी महाराष्ट्र शासनाचे कौतुक करून केंद्रीय मंत्री श्री. गडकरी म्हणाले मराठी संस्कृतीचे महत्त्व आपण बाहेर देशात असताना प्रभावीपणे जाणवते. आज विविध क्षेत्रांत मराठी माणूस पुढे गेलेला आहे. विज्ञान, तंत्रज्ञान तसेच विविध क्षेत्रांमध्ये दिलेल्या योगदानामुळे एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. आत्मनिर्भर भारत निर्माण करण्याबरोबरच शक्तिशाली अर्थव्यवस्था निर्माण करण्यामध्ये विदेशात असलेल्या भारतीयांचे योगदान खूप मोठे आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात असणाऱ्या मराठी माणसाने महाराष्ट्रामध्ये गुंतवणूक केली, येथील उद्योजकता वाढवली तर महाराष्ट्राचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही, असेही मंत्री श्री गडकरी यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, आपल्या सगळ्यांना मिळून सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचा प्रामुख्याने विचार करावा लागणार आहे. यासाठी पाणी, वीज, दळण वळण आणि संपर्क साधने यावर विशेष भर द्यावा लागणार आहे. या सुविधा ज्या ठिकाणी उपलब्ध आहेत, त्या ठिकाणी उद्योग विकासाला मोठ्या संधी आहेत. महाराष्ट्र शासनाने उद्योगक्षेत्राच्या विकासासाठी धोरण निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यायोगे ग्रामीण महाराष्ट्रात उद्योगविकासाला चालना मिळेल, असा विश्वासही श्री. गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला. महाराष्ट्राचे आणि मुंबईचे देशाच्या विकासात मोठे योगदान आहे. परंतु मराठी माणसाने केवळ नोकरी करणारा न होता नोकरी देणारा होण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करायला हवेत. आपण सकारात्मक विचार ठेवून हिमतीने व्यवसायात उतरले पाहिजे, असेही श्री. गडकरी यांनी यावेळी सांगितले. राज्यात उद्योगांचे विकेंद्रीकरण झाल्याशिवाय ग्रामीण महाराष्ट्र विकसित होणार नाही. गावही समृद्ध झाले पाहिजे, याकडे विशेष लक्ष देण्याची गरज त्यांनी विषद केली. मुंबई हा देशाच्या आर्थिक विकासाचा केंद्र बिंदू आहे. महाराष्ट्र शासनाने विविध क्षेत्राचा अभ्यास करून त्यांच्या विकासासाठी कालबद्ध नियोजन करावे, असेही श्री.गडकरी यांनी यावेळी सांगितले. तसेच नवउद्योजक यांना सोयी–सुविधा या वीहित मुदतीत उपलब्ध करून द्याव्यात, असेही त्यांनी यावेळी सांगितले. भारत देश हा सर्वात मोठा निर्यातदार देश होण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. मराठी भाषा, मराठी माणसांचे उद्योगातील योगदान आणि त्यांच्या केंद्रातील विविध खात्यांमार्फत सुरु असलेल्या विकास कामांबाबत त्यांनी माहिती दिली.

# मंद्रूप पोलिसांनी राष्ट्रीय महामार्गावर लुटालुट करणारी टोळी केली जेरबंद



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील मंद्रूप पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाने राष्ट्रीय महामार्गावर लुटालूट करणाऱ्या चौघा जणांची टोळीला जेरबंद करून ट्रक मधून चोरलेली पावणे तीन लाखाची केबल वायर जप्त केलेली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी, अंबादास नामदेव कुंभार (२७) सतीश वैजनाथ माने (३४) अमोल कट्टप्पा गायकवाड (२८) आणि सोमनाथ यशवंत भालेराव (२९) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. १३ डिसेंबर २०२२ च्या रात्री मौजे तेलंगवाडी ता मोहोळ ते मौजे नांदणी ता दक्षिण सोलापूरच्या दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर एका ट्रक मधून ६ लाख ८३ हजार ४९८ रुपये किमतीची केबल वायरची चोरी झाल्याबद्दल बबन माणिकराव गवई (४४) याने दिलेल्या फिर्यादीनुसार मंद्रूप पोलिसांकडे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्ह्याची गंभीर दखल मंद्रूप पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांनी घेऊन सदरचा तपास सहाय्यक फौजदार संदीप काशीद, पोलीस कॉन्स्टेबल संदीप काळे, दिनेश पवार यांच्या टीम कडे दिले होते. सदर टीमने गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळवून सदर गुन्हा करणाऱ्या संशयित इसमांची नावे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांना कळवली असता संशयीतांना ताब्यात घेऊन त्यांची तात्काळ चौकशी करण्याचा सूचना दिला होता. त्यानुसार तपास टीमने संशयित इसमांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. तसेच त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या केबल वायर पैकी २ लाख ८८ हजार १८० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे गुन्हा करताना वापरलेली दोन मोटरसायकली व एक ऑटो रिक्षात जप्त करण्यात आलेली असून पुढील तपास करीत आहेत. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, सोलापूर उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक फौजदार संदीप काशीद, पोलीस कॉन्स्टेबल संदीप काळे, दिनेश पवार यांनी केली आहे.

## परिवहन विभागाच्या कार्यालयाच्या परिसरात आधार केंद्र सुरू

पालघर : परिवहन विभागाशी संबंधित मोटार वाहनांचे कामकाज व वाहन चालक परवानाबाबत सर्व कामकाज ऑनलाईन व फेसलेस सेवाद्वारे वाहन मालकास करावयाच्या असून सदर सेवा या आधार कार्ड व मोबाईल ओ.टी.पी. (OTP) शी संलग्न असल्याने जनतेस मोटार वाहनांचे कामकाज व वाहन चालक परवानाबाबत कामकाज करताना अडचणी येऊ नये यासाठी शासन निर्देशानुसार कार्यालयाच्या आवारात कार्यालयीन वेळेत आधार केंद्र वसई, भाटपाडा, चंदनसार, विरार पूर्व येथे शासनाच्या निर्देशानुसार सुरू करण्यात आलेले आहे. नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा. असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी वसई यांनी केले आहे.

# नांदगाव येथे बालिका दिन उत्साहात!



**लातूर/प्रतिनिधी**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा ३ जानेवारी हा जन्मदिन बालीकादिन म्हणून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नांदगाव येथे उत्साहात संपन्न करण्यात आला. सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त उपस्थित माता पालक यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नजीऊल्ला शेख यांची उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून गावातील माता पालक व पिता पालक यांची उपस्थिती होती. नंतर कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित अंगणवाडी ताई, मदतनीस, शाळेतील महिला शिक्षिका व माता पालकांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत–सन्मान करण्यात आला. तसेच यावेळी अंगणवाडी ते सातवी वर्गातील प्रतिनिधीक सर्वरुपात कांही मूलींचा शाळेचे मुख्याध्यापक शेख यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत–सन्मान करण्यात आला. यानंतर पुढे शाळेतील विद्यार्थ्यांनी गीताच्या व भाषणाच्या माध्यमातून आपले विचार मांडले. यात पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सहावीतील बुशरा हुशेन शेख हिने तर आभार सातवीच्या भक्ती महादेव साळुंके हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनारकली शेख, प्रणिता नवगिरे, छाया कांबळे, पवार दिपक उदारे, सार्थक दुनघऊ, उमर चाऊस, नरसींग कांबळे यांनी प्रयत्न केले.




पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त रायझिंग डे सप्ताह साजरा करून पोलीस दल समाजातील विविध घटकांना पोलीस प्रशासनाची माहिती करून देत असते. या अंतर्गत भिवंडी शहर पोलीस ठसने व भोईवाडा पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने धामणकर नाका येथे पोलीस बंद पथकाच्या वाद्यवृंदा कडून राष्ट्रभक्तीपर सुरावटी वाजविल्या. या प्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतन काकडे, पोलीस अधिकारी कर्मचारी पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालय येथील विद्यार्थी उपस्थित होते. रायझिंग डे निमित्त पोलीस बँड पथका कडून राष्ट्रभक्तीपर गीते सुमधुर सुरावटीत वाजविली जात असताना त्याचा आनंद घेण्यासाठी अनेक नागरीक सहभागी झाले होते.

# देवणी येथे अग्निशामक दल गाडीचा लोकार्पण सोहळा संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी नगरपंचायतीला शासनातर्फे प्रदान करण्यात आलेल्या अग्निशामक दल गाडीचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. हा लोकार्पण सोहळा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन मानकरी यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी नगराध्यक्ष डॉ कीर्ती ताई घोरपडे यांच्यासह उपाध्यक्ष अमित मानकरी, दिलीप पाटील नागराळकर, नगरसेवक अनिल इंगोले प्रवीण बेले, योगेश ढगे, महादेव मळभगे, डॉ संजय घोरपडे, वैजनाथ लूल्हे, बाबुराव लांडगे, राजकुमार बंडगर, जाफर मोमीन, शेख इस्माईल, खंडेराव घोलपे, अमर बोरे यांच्यासह कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

09 To 15 JANUARY 2023 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 1/7/2023 9:29 PM Page 1








# बातम्यांबरोबरच राज्याच्या शाश्वत विकासातही पत्रकारांचे महत्त्वपूर्ण योगदान-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**मुंबई/प्रतिनिधी**

पत्रकारांचे काम केवळ बातम्या देण्यापुरते मर्यादित नसून राज्याच्या शाश्वत विकासातही पत्रकारांची महत्त्वाची भूमिका असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. आज पत्रकार दिनानिमित्त मुंबई येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह येथे अप्रतिम मीडिया न्युज नेटवर्क ने आयोजित केलेल्या चौथा स्तंभ राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव नंदकुमार, मुख्यमंत्री कार्यालयाच्या पायाभूत सुविधा कक्षाचे महासंचालक राधेश्याम मोपलवार, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील, मंत्रालय विधिमंडळ पत्रकार संघाचे अध्यक्ष मंदार पारकर, सिने अभिनेते आणि दिग्दर्शक मंगेश देसाई, विवेक देशपांडे, रंजीत कक्कड आणि अप्रतिम मीडियाचे संचालक डॉ. अनिल फळे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, बदलत्या तंत्रज्ञानाची नोंद घेऊन पत्रकारांनी वाटचाल केली पाहिजे. राज्य शासनही पत्रकारांसाठी वैद्यकीय सहायता योजना, अधिस्वीकृती योजना, पत्रकारांना निवृत्तीनंतर सन्मान अशा काही महत्त्वपूर्ण योजना राबविते. या योजनांमध्ये काही सुधारणा करण्याबाबत काही सूचना येत आहेत. लोकशाहीचा चौथा स्तंभ असणाऱ्या पत्रकारांच्या हितासाठी आवश्यक त्या सुधारणा या योजनांत जरूर करण्यात येतील, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, पत्रकारांचे काम केवळ बातमी लिहिणे नाही तर राज्याच्या शाश्वत विकासासाठी सुद्धा त्यांचे योगदान महत्वाचे आहे. गेल्या सहा महिन्यातील राज्य शासनाचे काम माध्यमांनी पाहिले आहे. लोकाभिमुख काम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्यातल्या ७५ वर्षाच्या ज्येष्ठांना मोफत एसटी प्रवास, समाजामध्ये ...पान ६ वर

# मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या २२व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या पुरस्कार वितरण समारंभात पालघर जिल्ह्यास पाच पुरस्कार!





**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या २२व्या वर्धापन दिनानिमित्त पत्रकार दिनी आयोजित केलेल्या पुरस्कार वितरण समारंभात पालघर जिल्ह्यात समाजातील विविध क्षेत्रात गौरवास्पद काम करणाऱ्या ५ जणांना ठाण्याचे आ. संजय केळकर यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी दै. प्रहारचे संपादक सुकृत खांडेकर उपस्थित होते. पत्रकार दिनाचे औचित्य साधून व मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या २२व्या वर्धापन दिनानिमित्त पुरस्कार वितरण समारंभात पालघर जिल्ह्यातील ५ जणांच्या उत्तम कामगिरीबद्दल पुरस्कार देण्यात आले. यात दै. लोकसत्ताचे वसई-विरार ब्युरो चीफ सुहास बिऱ्हाडे यांना कै. यशवंत पाध्ये स्मृती पुरस्कार, गेली ३६ वर्षे न्यायासाठी चिवटपणे लढणाऱ्या विरार येथील गंगाधर म्हात्रे यांना 'जीवनगौरव पुरस्कार', विद्यार्थी असतानाच भूमीमुक्ती आंदोलनात सहभागी ...पान ६ वर

# नाका कामगारांना सुरक्षा किटचे वाटप



**वसई/प्रतिनिधी**

'एकता कामगार युनियन' कडून नाका कामगारांना सुरक्षा किटचे वाटप करण्याचा कार्यक्रम पंचवटी नाका अंबाडी रोड वसई येथे आयोजित आला होता. शासनाकडून मिळालेल्या सुरक्षा किट घेण्यासाठी शेकडो नाका कामगार उपस्थित होते. 'सुरक्षा किट' हे एकता कामगार युनियनचे अध्यक्ष सुनील मिश्रा यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मॅकान्झी डाबरे तसेच रामेश्वर लांडगे, इरफान असे अनेक एकता कामगार युनियनचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. वसई तालुक्यातील नाका कामगार हे असंघटित कामगार आहेत. त्यांना संघटित करून शासकीय योजनेमध्ये समाविष्ट करण्यासाठी कामगार विभागाकडे त्यांची नोंदणी करून शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनांचा लाभ कामगारांना मिळावा तसेच कामगारांच्या मुलांना शिक्षणामध्ये सूट तसेच कामगारास अपघाती विमा अशा अनेक योजना शासनाकडून ...पान ६ वर

## वसई विरार महानगर पत्रकार संघातर्फे पत्रकार दिनाचे आयोजन

# पत्रकार संरक्षण कायदा हे पत्रकारांचे सुरक्षा कवच -जगदीश भोवड



**वसई/प्रतिनिधी**

आद्य संपादक स्व.बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती आणि पत्रकार दिनाचे औचित्य साधून, आज वसई विरार महानगर पत्रकार संघातर्फे पत्रकारांसाठी 'पत्रकार संरक्षण कायदा' आणि 'बातमीतील शुद्धलेखन' याविषयांवर मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन वसईत करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे, तथा व्याख्याते म्हणून दै. लोकमतचे वसई-पालघर आवृतीप्रमुख, तथा ज्येष्ठ पत्रकार जगदीश भोवड आणि मराठी व्याकरणाचे अभ्यासक, तथा जेष्ठ पत्रकार शरद विचारे उपस्थित होते. वसई पश्चिमेच्या निर्मळ येथील 'उषःकाल' विश्रामगृह सभागृहात आयोजित या कार्यक्रमात प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते स्व. बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी विविध वृत्तपत्रे आणि दुरचित्रवाहिनींचे तालुक्यातील विविध पत्रकार मोठया संख्येने उपस्थित होते.बॅसीन कॅथॉलिक सहकारी बँकेच्या सहकार्याने हा कार्यक्रम घेण्यात आला. राज्यसरकारने सन २०१७ मध्ये पारित केलेला पत्रकार संरक्षण कायदा हा पत्रकारांसाठी सुरक्षा कवच ठरला आहे. कारण २०१७ पूर्वी महाराष्ट्रात पत्रकारांवरील हल्लयाचे जे प्रमाण १० टक्के होते, ते या कायद्यानंतर तीन टक्क्यांपर्यंत आले आहे. या कायद्यातील तरतुदींमुळे पत्रकारांना हे संरक्षण मिळाले आहे. तथापि, पत्रकारिता करताना निर्भीडपणे आणि निस्पृहपणे पत्रकारांनी आपली सेवा बजावावी. तटस्थपणे पत्रकारिता केली तर या क्षेत्रात आपले ...पान ६ वर

# पत्रकारिता लोकशाहीचा चौथा स्तंभ आणि त्यामुळेच समाज घटकांना न्याय मिळत असतो - दीपक कोळी



**सोलापूर/प्रतिनिधी**

लोकशाहीत पत्रकारिता हा चौथा स्तंभ असून या स्तंभामुळे समाज घटकांना न्याय मिळत असतो असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता दीपक कोळी यांनी केले पत्रकार दिनाचे औचित्य साधून सोलापूर ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत जिल्हा परिषद बीट कार्यरत पत्रकारांचा सन्मान कार्यकारी अभियंता दीपक कोळी यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी कार्यकारी अभियंता बांधकाम सुनील कटकधोंड प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, प्रशासनाधिकारी गिरीश जाधव, कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेश देशपांडे, कास्ट्राइब कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुणभाऊ क्षीरसागर यांच्यासह नवराष्ट्राचे पत्रकार शेखर गोतसुर्वे, तरुण भारतचे राजकुमार सारोळे, प्रशांत कटारे, इरप्पा बोरीकरजगी यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना ...पान ६ वर

## राष्ट्रीय बहुजन विकास संघटनेतर्फे संविधान निष्ठा यात्रा नालासोपारा शहरामध्ये दाखल

# भारतीय राज्यघटना सर्व भारतीयांना तारणारा महान ग्रंथ आहे -शरदअण्णा तिगोटे

**नालासोपारा/प्रतिनिधी**

प्रजा सुराज्य चॅरिटेबल ट्रस्ट आणि राष्ट्रीय बहुजन विकास संघटनेच्या वतीने छत्रपति शिवाजी महाराज स्मारक जि.प.शाळा समेळ पाडा, नालासोपारा येथुन संविधान गौरव दिन, जागर जागृती अभियान या कार्यक्रमाचा महत्वपूर्ण भाग म्हणून संविधान निष्ठा यात्रेचा शुभारंभ दि. ०१ जानेवारी २०२३ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. भारतीय संविधानाचा सारांश असलेली संविधानाची उद्देशिका घराघरात पोहचवणे व त्या माध्यमातुन भारतीय राज्यघटनेमधील समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय व धर्मनिरपेक्षता या मानवी मूल्यांचा प्रचार प्रसार करणे हा या यात्रेमागील मुख्य उद्देश्य आहे. यावेळी मा.गोविंद पिंपळगावकर अखिल भारतीय जिवा सेना राष्ट्रीय अध्यक्ष, प्रजा सुराज्य पक्षाचे राष्ट्रीय प्रभारी



बच्चु भाई कनोजिया तसेच राष्ट्रीय बहुजन विकास संघटना तथा प्रजा सुराज्य पक्षाचे संस्थापक अध्यक्ष अण्णासाहेब तिगोटे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून यात्रेला सुरवात करण्यात आली. भारतीय राज्यघटनेच्या मुल्यांना नष्ट करू पाहणाऱ्या व सांप्रदायिक शक्तींचा समाजात वाढत चाललेला कट्टरवाद आणि त्यामुळे जातीजातींमध्ये, धर्माधर्मामध्ये द्वेष पसरवून दंगल घडवू पाहणाऱ्याना वेळीच रोखले पाहिजे. यासाठी घराघरात जाऊन जनजागृती करावी असे आवाहन प्रजा सुराज्य पक्षाचे संस्थापक अध्यक्ष अण्णासाहेब तिगोटे यांनी कार्यकर्त्यांना केले. ते पुढे म्हणाले, काही धर्मांध शक्ती धर्माच्या नावाने इतर धर्माबद्दल व जातींबद्दल तिरस्काराची भावना वाढविण्याचे काम करीत आहेत. तर दुसरीकडे विनाशकारी आर्थिक धोरणाच्या स्वीकारामुळे सर्वसामान्य जनतेच्या हातून जगण्याची सर्व साधने-संसाधने काढून नेली जात आहेत. भारतीय संविधानाला छेद देणाऱ्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. सर्वांनी संविधानातील उद्देशिकेतील मानवी मूल्य जपली पाहिजेत. जनतेचे अधिकार व कर्तव्यासोबत संविधानाचे महत्व आपल्या सर्वांना पुन्हा पुन्हा समजून घेण्याची गरज निर्माण झाली आहे.आजच्या या गंभीर परिस्थितीत भारतीय नागरिकांना जर कोणी तारू शकत असेल तर ते भारतीय संविधान हा एकमेव महान ग्रंथ आहे.असे अण्णासाहेब म्हणाले. यासाठी दि. २७ नोव्हेंबर २०२२ ते २६ जानेवारी २०२३ पर्यत गावागावात, वस्त्यांमध्ये, पाड्यांमध्ये जाऊन संविधानाच्या उद्देशिकेच्या ...पान ६ वर


